

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, बुधवार दि. ०४.११.२०२६ अंक नं. १८३ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020
















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

अहिल्यानगरमध्ये ५ नोव्हेंबर रोजी 'दिवाळी संध्या संगीत मैफल'

नगर – आरव्ही ग्रुप ऑफ इव्हेंटस, नगर जल्लोष (ट्रस्ट) आणि श्री बडीसाजन ओसवाल युवक संघाने ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, अहिल्यानगर येथे दिवाळी संध्या संगीत मैफल आयोजित केली आहे.

सारेगमप फेम गायिका ब्रह्मानंदा पाटणकर यांच्या सुमधुर आवाजातील भावगीतं, भक्तीगीतं आणि दिवाळीची गाणी रसिकांना अनुभवता येणार आहेत. त्यांना साथ देणार आहेत युवा सिंगर एक नंबर फेम गायक चेतन लोखंडे. दोघांच्या जुगलबंदीने दिवाळीची संध्या खऱ्या अर्थाने सुरेल होणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये उपस्थित रसिक श्रोत्यांना दिवाळीच्या सर्व फराळ खरेदीसाठी दहा टक्के मोफत डिस्काउंट देणारे कुपन दिले जाणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून जेष्ठ संगीत समीक्षक व रेडिओनगर संचालक सुहासभाई मुळे हे मार्गदर्शन करणार आहेत. आयोजकांनी या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य ठेवला असून, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर आसनव्यवस्था असेल. त्यामुळे संगीतप्रेमींनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा आणि आनंदाचा उत्सव. या उत्सवाला सुरांची जोड देऊन शहरातील सांस्कृतिक वातावरण अधिकच प्रफुल्लित करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे आहे. नगर जल्लोष २०२६ – कला संस्कृती परंपरा जपण्याचा हा एक प्रयत्न असून, अहिल्यानगरकरांनी या सुरेल संध्येचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम प्रमुख सुहासभाई मुळे, आरव्ही ग्रुप ऑफ इव्हेंटस आणि श्री बडीसाजन ओसवाल युवक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या महासभेमध्ये केडगावसह विविध प्रभागांतील पाणीटंचाईवर नगरसेवक आक्रमक; पथदिव्यांच्या प्रश्नावर खडाजंगी

विकास आराखडा व रस्त्यांच्या मुद्यांवर चर्चा

नगर – दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीप्रश्न, धरणातील पाणीसाठा, विविध प्रभागांतील अनियमित व दूषित पाणीपुरवठा, महावितरणला जागा उपलब्ध करून देण्याचा विषय, शहर विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती, रस्त्यांची कामे आणि पथदिव्यांच्या प्रश्नांवर महानगरपालिकेच्या महासभेत चर्चा झाली. विविध नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरत नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. पथदिव्यांच्या मुद्यावर नगरसेवकांमध्ये खडाजंगीही झाली. अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबरला पार पडली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, उपायुक्त मेहर लहारे उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला संपत बारस्कर यांनी विषयपत्रिकेवरील विषय अगोदर घेण्याची मागणी केली.





महासभेत पाणीप्रश्न, विकास आराखडा आणि रस्त्यांच्या मुद्यांवर जोरदार चर्चा झाली. केडगावसह विविध प्रभागांतील पाणीटंचाईवर नगरसेवक आक्रमक झाले होते. पथदिव्यांच्या प्रश्नावर सभागृहात खडाजंगी झाली. (छायाचित्र – लहू दळवी)

स्व. अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा

गंगा उद्यान चौक येथे स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा विषय सभेत चर्चेला आला. सागर बोरुडे यांनी पुतळा उभारणीसाठी आवश्यक प्रक्रिया आणि परवानग्या मिळविण्याकरिता कालमर्यादा निश्चित करावी, तसेच या कामाचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी, अशी मागणी केली. सुरेश बनसोडे यांनी चौकाला काका चौक असे नाव देऊन नामकरण करण्याची सूचना केली. बाबासाहेब वाकळे यांनीही समिती स्थापन करून पुतळा उभारणीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, चौकाचे सुशोभीकरण करावे आणि चौकाला अरुणकाकांचे नाव द्यावे, अशी भूमिका मांडली. यावेळी संपत बारस्कर आणि प्रकाश भागानगरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला. महापौर ज्योती गाडे यांनी महापौर, उपमहापौर, बाबासाहेब वाकळे आणि संपत बारस्कर यांच्यासह सर्व संबंधितांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात येईल, असे सांगितले. त्यानंतर हा विषय मंजूर करण्यात आला.

शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सभेत सविस्तर चर्चा

शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सभेत सविस्तर चर्चा झाली. निखिल वारे यांनी १४ ग्रामपंचायतींकडे महापालिकेची १६१ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा मुद्दा उपस्थित केला. सामान्य नागरिकांचे नळजोड तोडण्याची कारवाई महापालिका करते, मग ग्रामपंचायतींकडील थकबाकी वसूल करण्यासाठी काय कारवाई केली, न्यायालयात दावा दाखल केला आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनाने या प्रकरणी खंबीर भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावर गणेश गाडळकर यांनी जिल्हा परिषदेकडे थकबाकी वसुलीसाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. वारे यांनी विळद येथील पाण्याच्या टाकीजवळील एक्स्प्रेस फिडरचा खर्च महापालिका करत असताना तेथून खासगी व्यक्तीला वीजजोडणी देण्यात आली आहे का, अशी विचारणा केली. यासाठी महापालिकेने ना–हरकत प्रमाणपत्र दिले आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. संपत बारस्कर यांनी पाणी कपातीबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी केली.

अन्यथा आम्हाला मनपा हद्दीतून काढा

सुनीता कांबळे आणि विजय पठारे यांनी केडगावात सहा ते सात दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. पाणीपुरवठा सुरळीत होत नसेल तर आम्हाला महापालिकेतून काढून टाका, अशी संतप्त भूमिका त्यांनी मांडली. यावर गणेश गाडळकर यांनी गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. आता टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा सुरळीत होत असल्याचे सांगितले. सागर बोरुडे यांनी शहरात वारंवार जलवाहिन्या फुटत असल्याचा मुद्दा मांडला. अविनाश घुले यांनी कानडे मळा परिसरातील पाणीसमस्या मांडली. शारदा ढवण यांनी आपल्या प्रभागात अवेळी पाणीपुरवठा होत असल्याचे सांगत सकाळी किंवा संध्याकाळी पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. दरम्यान, केडगावच्या पाणीप्रश्नावरून स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक मनोज कोतकर यांनी अधिकाऱ्यांचे पाय धरून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शहरातील विविध भागांतील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांची तीव्रता या सभेतून पुन्हा एकदा समोर आली.

अन्यथा आपणच सभागृहातून निघून जाऊ

मनोज कोतकर यांनी केडगावला सापत्न वागणूक देऊ नका, आमच्याही भागात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, असे सांगितले. पुष्पा बोरुडे आणि वंदना ताठे यांनी प्रभाग क्रमांक सातमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. संपत बारस्कर यांनी धरणातील पाणीसाठा किती आहे आणि महापालिकेसाठी किती पाणी उपलब्ध आहे, याची माहिती मागितली. यावेळी सुरेखा कदम यांनी सभागृहातील कामकाजावर नाराजी व्यक्त केली. हा विषय मांडण्यासाठी आपण अर्ध्या तासापासून उभे असूनही बोलण्याची संधी दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले. यावर महापौर ज्योती गाडे यांनी सर्वांना शांत बसण्याचे आवाहन केले. सर्वांनी जागेवर बसावे, अन्यथा आपणच सभागृहातून निघून जाऊ, असे त्यांनी स्पष्ट केले. पाणीप्रश्नावर १८ तारखेला स्वतंत्र सभा घेण्यात येईल, असे सांगून त्यांनी सध्या विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा करण्याचे निर्देश दिले.

मुंकुदनगरवरून सभागृहात वादावादी

मुकुंदनगरमध्ये कामगारांवर अन्याय झाल्याचा आणि एका कामगाराचा खून झाल्याचा मुद्दा उपस्थित करत, या प्रकरणातील आरोपींवर कारवाई होण्यासाठी पाठपुरावा का केला जात नाही, असा सवाल संपत बारस्कर यांनी केला. मुकुंदनगरमध्ये कामगारांवर हल्ले होत असतील तर तेथे कोण जाणार, अशीही चर्चा झाली. मुकुंदनगरच्या नगरसेवकांनी पथदिवे आणि पाणी यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर मागण्या करू नयेत का, असा मुद्दाही चर्चेत पुढे आला. या विषयावर अधिक चर्चा करू नये, विषय बंद करावा, अशी भूमिका बारस्कर यांनी मांडली. त्यामुळे सभागृहात काही काळ वादाचे वातावरण निर्माण झाले.



जोधपूर येथील केंद्रीय कारागृहात असलेले श्री आसाराम बापू यांची प्रकृती गंभीर असून, त्यांना तातडीने योग्य वैद्यकीय उपचार व आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी श्री योग वेदांत सेवा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. (छायाचित्र – उदय जोशी)

आसाराम बापू यांच्या प्रकृतीची चिंता; तातडीने उपचारांची व्यवस्था करावी

श्री योग वेदांत सेवा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान व अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदन

नगर – जोधपूर येथील केंद्रीय कारागृहात मागील सुमारे १३ वर्षांपासून बंदिस्त असलेले ८७ वर्षीय संत श्री आसाराम बापू यांची प्रकृती गंभीर असून, त्यांना तातडीने योग्य वैद्यकीय उपचार व आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी श्री योग वेदांत सेवा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आसाराम बापू हे अनेक गंभीर व दीर्घकालीन आजारांनी त्रस्त आहेत. त्यांना अलीकडेच गंभीर स्वरूपाचा हृदयविकाराचा झटका आल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीय, अनुयायी आणि हितचिंतकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. त्यांना जोधपूर येथील आरोग्यम हॉस्पिटलमध्ये तातडीने उपचारासाठी दाखल करण्याची व्यवस्था करावी. तसेच केंद्रीय कारागृहात त्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा, औषधोपचार आणि दैनंदिन जीवनासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. न्यायालयाच्या आदेशांचे प्रभावी पालन करून त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. एका ज्येष्ठ व गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तीचे जीवन, आरोग्य, उपचार आणि मानवी प्रतिष्ठा जपणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शहरप्रमुख देविदास मुदगल, बापू ठाणगे, अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हाध्यक्ष सुरेखा सांगळे, श्री योग वेदांत सेवा समितीचे उपाध्यक्ष भगवान गवळी, सुरज रवे, दत्ता वामन, अनुराधा मुंढे, संगीता ठुबे, जया म्याना, वैशाली कुलकर्णी, सोनाली नवसुपे, सूर्यमाला नवसुपे, उषा ढोकणे, निलेश बगळे, बबन भगत, राजेंद्र पाटील, किरण वाघ, अरविंद वाबळे, शिवम ठुंबे, रामचंद्र पळुसकर, राजेंद्र भुजबळ, अमोल ढोरकुले, सुनील भराट, अनुराधा भराट, चांगदेव कराळे, सुजित विधाते, भरत शिरसाठ आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.







अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने शिक्षकांवर वाढलेल्या अशैक्षणिक व प्रशासकीय कामांच्या ओझ्याविरोधात आणि दडपशाहीविरोधात जिल्हा परिषद कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. खासदार नीलेश लंके, आमदार सत्यजीत तांबे, एमपीएससी आंदोलनाचे युवा नेते विवेकानंद पाटील यांनी मोर्चात सहभाग घेत शिक्षकांचे प्रश्न समजून घेतले. मोर्चात महिला शिक्षिका सहभागी झाल्या होत्या.

अशैक्षणिक, प्रशासकीय कामांच्या ओझ्याविरोधात शिक्षकांचा जिल्हा परिषदेवर मोर्चा

खा. नीलेश लंके, आ. सत्यजीत तांबे, विवेकानंद पाटील यांच्यासह जिल्ह्यातील शिक्षक सहभागी

नगर – अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक समन्वय समितीच्या वतीने शिक्षकांवर वाढलेल्या अशैक्षणिक व प्रशासकीय कामांच्या ओझ्याविरोधात आणि दडपशाहीविरोधात ४ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. वाडिया पार्कपासून सुरु झालेला हा मोर्चा जिल्हा परिषदेत आला होता. जिल्ह्यातील १३ हून अधिक प्राथमिक शिक्षक संघटना या आंदोलनासाठी एकत्र आल्या होत्या. खा. नीलेश लंके व आ. सत्यजीत तांबे यांनी मोर्चात सहभागी होत शिक्षकांच्या भावना शासनाकडे पोहचविण्याची ग्वाही दिली. तसेच एमपीएससी आंदोलनातील विवेकानंद पाटील यानेही या मोर्चात सहभाग नोंदविला. मोर्चात जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक सहभागी झाले होते. अशैक्षणिक कामांचा प्रतिकात्मक राक्षस या मोर्चात सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

शासकीय शाळांमधील शिक्षकांवर दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्यामुळे राज्यातील सार्वजनिक शिक्षणव्यवस्था अक्षरशः मेटाकुटीला आली आहे. बीएलओ, एसआयआर, जनगणना यांसारख्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांपासून ते विविध ऑनलाइन पोर्टल, गुगल फॉर्म, एक्सेल शीट आणि माहिती संकलनाच्या असंख्य कामांमध्ये शिक्षकांना सतत गुंतवून ठेवले जात आहे. त्यातच शासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी, अनुदानाच्या खर्चाचा ऑनलाइन हिशोब आणि वेगवेगळ्या प्रणालींवर माहिती भरण्याची जबाबदारी यामुळे शिक्षकांचा अध्यापनासाठीचा वेळ आणि मानसिक स्वास्थ्य दोन्ही हिरावले गेले आहे. शाळांमधील शैक्षणिक नियोजन आणि वेळापत्रक कोलमडत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. शासनाच्या शिक्षणविरोधी धोरणांबाबत समाजात विशेषतः शिक्षणविश्वात कमालीचा असंतोष निर्माण झाला आहे. या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात आबासाहेब जगताप, बापूसाहेब तांबे, प्रविण ठुबे, सुरेश निवडुंगे, कल्याण लवांडे, बबन गाडेकर, राजेंद्र ठोकळ, प्रवीण झावरे, सिताराम सावंत, राजेंद्र निमसे, गोकुळ कळमकर, नवनाथ अडसूळ, गौतम मिसाळ, अर्जुन शिरसाठ, विद्या आढाव, शरद वांढेकर, विकास डावखरे, दत्ता पाटील कुलट, संतोष दुसगे, संतोष खामकर, अमित पन्हाळे, नारायण पिसे, एकनाथ व्यवहारे, अविनाश निंभोरे, प्रकाश नांगरे, शरद कोतकर,आबासाहेब दळवी, विजय महामुनी, गणेश पिंपळे, बाळासाहेब रोहोकले, योगेश देशमुख, रघुनाथ झावरे, दशरथ ढोले, गणेश कुलांगे, आबासाहेब ठाणगे, संदीप शिंदे, राजाभाऊ बळीत, विलास लवांडे, संतोष साळे, दिलीप शिंदे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक सहभागी झाले होते.

आम्हाला विद्यार्थ्यांना शिकवू द्या

मोर्चात सहभागी प्राथमिक शिक्षकांनी आम्हाला शिकवू द्या या मुख्य घोषणेसह जिल्हा परिषद दणाणून सोडला. शिक्षकांचे मुख्य काम विद्यार्थ्यांना शिकवणे, त्यांच्या अध्ययनातील अडचणी समजून घेणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे हे आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीत शिक्षकांना शिकवण्यापेक्षा ऑनलाइन माहिती भरणे, लिंक अपडेट करणे, अहवाल तयार करणे आणि प्रशासकीय आदेशांची पूर्तता करणे यासाठीच अधिक वेळ खर्च करावा लागत आहे. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत शिक्षकांच्या व्हॉट्सप समूहांवर विविध लिंक, आणि तातडीने माहिती मागवणारे संदेश येत असतात. आजच्या आज, आत्ताच्या आत्ता माहिती सादर करण्याच्या आदेशांमुळे शिक्षकांवर सतत मानसिक दबाव निर्माण होत आहे. अध्यापनाचे नियोजन, विद्यार्थ्यांची पूर्वतयारी, मूल्यमापन आणि वैयक्तिक मार्गदर्शन यासाठी आवश्यक असलेला निवांत वेळच शिक्षकांच्या वाट्याला उरलेला नाही, अशी तक्रार अनेक शिक्षकांनी यावेळी केली.

महिला शिक्षकांची उपस्थिती लक्षणीय

महिला शिक्षकांच्या सुरक्षिततेचा, त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा आणि मानसिक स्वास्थ्याचा प्रशासनाने संवेदनशीलतेने विचार करावा यासाठी मोर्चात महिला शिक्षकांची उपस्थिती मोठी होती. शिक्षकांवरील अविश्वासाचे वातावरण दूर करून त्यांना सन्मान, विश्वास आणि वर्गात अध्यापनासाठी आवश्यक असणारा पुरेसा वेळ उपलब्ध करून द्यावा. या आंदोलनाचा मुख्य उद्देश कोणत्याही व्यक्तीविरुद्ध संघर्ष करणे नसून, शिक्षकांना सन्मानपूर्वक काम करण्याचे वातावरण मिळणे आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क जपणे हा आहे, अशी भूमिका शिक्षक संघटनांनी मांडली.


संतोष भंडारी यांचे संथाराव्रतात निधन

नगर – सागर कॉम्प्लेक्स, स्विट कॉर्नर, आगरकर मळा येथील रहिवासी संतोष पोपटलाल भंडारी (वय ६२) यांचे ४ नोव्हेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऋषभ, किरण, पूनम यांचे वडील तर अलका भंडारी यांचे ते पती होत.



शंकर कुलकर्णी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – रासनेनगर सावेडी येथील रहिवासी शंकर मनोहर कुलकर्णी (वय ७०) यांचे ३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे ४ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुनीता कुलकर्णी यांचे पती तर अभिजीत व विश्वजीत यांचे ते वडील होत. पाटबंधारे खात्यामध्ये ते उपअभियंता होत.



अहिल्यानगरच्या प्रारूप विकास आराखड्याला उच्च न्यायालयाची स्थगिती

शाकीर शेख यांच्या याचिकेवर आदेश; पुढील आदेशापर्यंत आराखडा अंतिम करण्यास मनाई

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास आराखड्यात नागरिकांच्या सूचना व हरकती मागविण्यापूर्वीच नगरसेवकांच्या सूचनांनुसार आरक्षणे, रस्ते, रस्त्यांची रुंदी तसेच जमिनींच्या वापरात बदल करण्यात आल्याचा आरोप शाकीर शेख यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी १२ ऑक्टोबरला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. सुनावणीनंतर न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले असून पुढील सुनावणी १२ जानेवारी २०२७ रोजी ठेवली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे न्यायालयाने ७ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला प्रारूप विकास आराखडा पुढील आदेशापर्यंत अंतिम करण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या याचिकेवर ३ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती अबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. यू. ए. आवटे व ॲड. अजिंक्य काळे यांनी बाजू मांडली, तर शासनाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील ॲड. एस. के. तांबे उपस्थित होते. याचिकेतील माहितीनुसार, नगररचना अधिकारी तथा नगररचना उपसंचालक यांनी तयार केलेली मूळ प्रारूप विकास योजना १८ मे रोजी प्रसिद्धीसाठी महापालिकेकडे हस्तांतरित केली होती. मात्र, ३० जुलै रोजी महासभेतील ठराव क्रमांक २३ द्वारे आरक्षणे वगळणे, नवीन आरक्षणे समाविष्ट करणे, रस्ते वगळणे तसेच जमीनवापरात बदल करण्याचे निर्णय घेण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर बदललेला आराखडा ७ सप्टेंबरला प्रसिद्ध करण्यात आला.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम २६ व २८ मधील कायदेशीर प्रक्रियेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दा याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. तसेच गोविंद बाजीराव नवपुते विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या ५ ऑगस्ट २०१६ च्या निर्णयाचाही आधार घेण्यात आला आहे.

नागरिकांच्या हरकतींची सुनावणी करण्यासाठी नियुक्त तीन नगरसेवकांच्या समितीच्या निष्पक्षतेवरही शेख यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. आराखड्यात बदल सुचविणारे आणि नागरिकांच्या हरकती ऐकणारे सदस्य सत्ताधारी पक्षाशी संबंधित असल्याने सुनावणी प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ठराव क्रमांक २३ विखंडित करा; आयुक्तांच्या चौकशीची मागणी

३० जुलैचा ठराव क्रमांक २३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१(१) व ४५१(३) अन्वये विखंडित करावा, तसेच महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची विभागीय चौकशी करावी, अशी मागणी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे करण्यात आली आहे. मूळ व सुधारित आराखड्याची आरक्षणनिहाय तुलना सार्वजनिक करावी आणि नागरिकांना मराठी भाषेत माहिती उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशामुळे अहिल्यानगरच्या विकास आराखड्याच्या अंतिमीकरणाला तूर्तास ब्रेक लागला आहे. शहराच्या विकास आराखड्यातील बदलांची प्रक्रिया पारदर्शक आणि कायदेशीर असावी, नागरिकांच्या हरकतींना योग्य न्याय मिळावा आणि शहराचे सार्वजनिक हित सुरक्षित राहावे, यासाठी न्यायालयीन लढा सुरूच ठेवणार असल्याचे शाकीर शेख यांनी सांगितले.

गृहिणी

आरोग्य

स्टॅमिना वाढविण्यासाठी

वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि शरीराची ताकद म्हणजेच स्टॅमिना वाढवण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोजच्या जीवनशैलीत योग्य बदल करणे. यासाठी रोजच्या आहारात पौष्टिक आणि ताजी फळे, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करावा. रोज सकाळी किंवा संध्याकाळी नियमितपणे वेगाने चालणे, धावणे किंवा योगासने केल्याने शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढून स्टॅमिना वाढण्यास मदत होते. दिवसभरात भरपूर पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे, कारण पाण्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर पडतात आणि चयापचय क्रिया वेगाने होते, ज्यामुळे वजन आटोक्यात राहते. तसेच, ज्या पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात साखर, तेल आणि मैदा असतो, अशा तळलेल्या किंवा पचनास जड असणाऱ्या अन्नापासून दूर राहावे. अन्नाचे योग्य पचन होण्यासाठी जेवण नेहमी नीट चावून आणि शांतपणे खावे. स्टॅमिना वाढवण्यासाठी शरीराला पुरेशी विश्रांती मिळणे आवश्यक असते, त्यामुळे दररोज रात्री सहा ते आठ तासांची गाढ झोप घेणे अत्यंत गरजेचे आहे. मन शांत ठेवण्यासाठी आणि मानसिक थकवा दूर करण्यासाठी नियमित प्राणायाम करावा, कारण मन प्रसन्न असेल तर शारीरिक क्षमताही वाढते. अशा प्रकारे योग्य आहार, नियमित शारीरिक हालचाल, भरपूर पाणी आणि पुरेशी झोप या सवयी रोजच्या जीवनात अंगीकारल्यास वजन नियंत्रणात राहून शरीराची ऊर्जा आणि स्टॅमिना वाढू लागतो.

पाककला

गुलाब-पिस्ता बर्फी

साहित्य : खवा / मावा २५० ग्रॅम, मिल्क पावडर १/२ वाटी, साखर ३/४ वाटी, पाणी १/४ वाटी, साजूक तूप २ चमचे, बारीक चिरलेला पिस्ता २ चमचे, गुलाब पाकळ्या वाळवलेल्या १ चमचा, गुलाब इसेन्स ३ थेंब, गुलाबी खाण्याचा रंग २ थेंब, वेलची पावडर १/४ चमचा, सजावटीसाठी पिस्ता काप आणि गुलाब पाकळ्या

कृती : प्रथम एका कढईत साखर आणि पाणी घालून एकतारी पाक तयार करा. त्यात साजूक तूप घाला. मंद आचेवर खवा / मावा कुस्करून घाला आणि सतत ढवळत राहा. त्यात मिल्क पावडर घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत परतून घ्या. मिश्रण कढई सोडेपर्यंत शिजवा. त्यात गुलाब इसेन्स, गुलाबी रंग, वेलची पावडर, चिरलेला पिस्ता आणि गुलाब पाकळ्या घालून मिश्रण एकजीव करा. तूप लावलेल्या ताटात हे मिश्रण जाडसर थर देऊन पसरा. वरून पिस्ता काप आणि गुलाब पाकळ्या ठेवून हलक्या हाताने दाबा. थंड झाल्यावर चौकोनी तुकडे करून सर्व्ह करा.

वास्तू

उंबऱ्यासाठीचे साहित्य

* उंबऱ्यासाठी सागवानी लाकूड सर्वोत्तम मानले जाते. लाकडी उंबरा शक्य नसल्यास ग्रॅनाइट किंवा संगमरवर वापरू शकता.
* उंबरा मधोमध तुटलेला, क्रॅक गेलेला किंवा सैल झालेला नसावा. तो जमिनीपासून किंचित उंच असावा जेणेकरून बाहेरील धूळ आणि वाईट ऊर्जा सहजासहजी आत येणार नाही.
* उंबऱ्याच्या खाली किंवा दोन्ही बाजूला चांदीची तार किंवा लहान नाणे बसवणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे घरात आर्थिक स्थैर्य राहते.

सौंदर्य

* २ ते ३ महिन्यांनी केसांचे शेंडे ट्रिम केल्याने दुभंगलेले केस कमी होतात.
* जर आयर्निंग किंवा ड्रायर वापरणार असाल, तर आधी हीट प्रोटेक्टंट स्प्रे लावा.
* पिवळी पडलेली नखे स्वच्छ करण्यासाठी लिंबाची साल नखांवर घसा.

सल्ला

* भज्यांचे पीठ भिजवताना त्यात १ चमचा गरम तेल आणि थोडे तांदळाचे पीठ घातल्यास भजी तेल न शोषता एकदम कुरकुरीत होतात.
* किचन ओटा पुसताना पाण्यात थोडे जाडे मीठ टाकल्यास किडे होत नाहीत.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६

रमा एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, उत्तरा २७।५६, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस तुमच्यासाठी अत्यंत उत्साहवर्धक ठरेल.

वृषभ : आज तुमच्या आर्थिक स्थितीत सुधारणा दिसून येईल.

मिथुन : तुमची बौद्धिक क्षमता मुळे आज सर्व कामे सहजरीत्या मार्गी लागतील.

कर्क : कामाच्या ठिकाणी तुमच्या प्रयत्नांचे कौतुक होईल.

सिंह : आज तुमच्या आत्मविश्वासात प्रचंड वाढ होईल.

कन्या : आज एकाग्रतेने केलेल्या सर्व कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

तूळ : नवीन योजनांवर काम करण्यासाठी आजचा दिवस खूप अनुकूल आहे.

वृश्चिक : प्रदीर्घ काळापासून सुरू असलेले प्रयत्न यशस्वी होतील.

धनु : आज नशिबाची भक्कम साथ मिळाल्यामुळे कामाचा ताण कमी होईल.

मकर : आज तुमच्या कार्यक्षेत्रात चांगली प्रगती दिसून येईल.

कुंभ : आजचा दिवस लाभदायक ठरेल आणि नवीन संधी तुमचे दार ठोठावतील.

मीन : आर्थिक लाभ आणि मानसिक समाधानामुळे दिवस आनंदात जाईल.


शब्दगंध क्र. ७५५१ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) 'कोर्ट'चे मराठी रूप ४) प्रमाणपत्र; सरकारी शिक्षापत्र ६) अभ्यास; सराव ७) एक समसंख्या; एका तपातील वर्षांची संख्या ८) शोभिवंत केलेली रचना; मखर; देखावा १०) फार बलाढ्य १२) वर्तमान काळी १४) उपहास; फजिती; हुर्यो १५) अधिक चांगला; श्रेष्ठ १६) उणीव; कमतरता; कसर १७) आईचा भाऊ; मातुल १८) उंदीर वर्गातील पण थोडा मोठा जीव २०) लहान (भाऊ वगैरे) २३) गवळ्याची बायको २४) पापी लोक मृत्यूनंतर येथे जातात असे म्हटले जाते

उभे शब्द :- १) प्रतिष्ठान; ट्रस्ट २) जोंधळ्याचा दाणा ३) वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज; अखेर; अंत ४) अभ्यास; सराव ५) योग्यता; स्तर; चांगलेवाईटपणा ७) मार्केट, हाट; मंडई ८) एक सम संख्या ९) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १०) सुंदर; छान ११) स्वत:ला उलटे टांगून घेणारा एक पक्षी १३) एकसारखे सतत चिंतन १५) शंकानिवृत्ती; संतोष; आनंद १९) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस २१) हात; सारा; महसूल; हस्त २२) पूर्वीच्या काळातील एक लेखणी

शब्दगंध क्र. ७५५० चे उत्तर



* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

सुविचार : तुमचा आजचा प्रामाणिकपणाच तुमच्या उद्याच्या यशाचा पाया असतो.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

गरम दूध किंवा चहावर साय का साचते?

आपण सर्वांनीच कधी ना कधी गरम चहा किंवा दुधाचा वाफाळता कप हातात घेतला असेल आणि त्यावर तरंगणारा तो मऊ, पांढरा किंवा पिवळसर थर म्हणजेच आपली 'साय' पाहिली असेल. लहान मुलांच्या मनात कायम हा प्रश्न येतो की, नेमके असे काय घडते ज्यामुळे दुधावर किंवा चहावर हा पडदा तयार होतो? याचे उत्तर दडलेले आहे आपल्या रोजच्या स्वयंपाकघरातल्या साध्या विज्ञानात.

जेव्हा आपण दूध किंवा चहा तापवण्यासाठी भांड्यात ठेवतो, तेव्हा आतील पाण्याचे तापमान वाढू लागते. उष्णतेमुळे दुधातील पाण्याचा काही भाग वाफेच्या रूपाने हवेत उडून जाऊ लागतो. आता, दुधामध्ये पाण्यासोबतच अनेक पौष्टिक घटक जसे की चरबी (फॅट), प्रथिने (प्रोटीन्स) आणि शर्करा विरघळलेली असते. जेव्हा दूध तापवले जाते, तेव्हा या प्रक्रियेत पाण्याची वाफ होऊन वरच्या थरावरील पाण्याचे प्रमाण कमी होते आणि हे घन घटक अधिक प्रमाणात एकत्र येऊ लागतात.

या प्रक्रियेत आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडते. तापवलेले दूध किंवा चहा जेव्हा भांड्याच्या अगदी वरच्या भागात येतो, तेव्हा तो थेट खोलीच्या किंवा बाहेरील खुल्या हवेच्या संपर्कात येतो. भांड्याच्या आतील भाग गरम असला तरी, दुधाचा अगदी वरचा थराचा संपर्क थंड हवेसोबत येतो. यामुळे वरच्या थराचे तापमान खालच्या दुधापेक्षा किंचित कमी होते.

जेव्हा हे घडते, तेव्हा दुधातील प्रथिने आणि चरबीचे कण एकमेकांशी घट्टपणे जोडू लागतात. हे कण हलके असल्यामुळे ते आपोआप पृष्ठभागावर तरंगत येतात. थंड हवेच्या संपर्कात आल्यामुळे हे एकत्रित झालेले प्रथिने आणि चरबीचे जाळे अधिक घट्ट होते आणि त्याचा एक सलग, पातळ पडदा तयार होतो. या पडद्यालाच आपण सर्वजण 'साय' असे म्हणतो.

चहाच्या बाबतीतही असेच होते; चहामध्ये घातलेले दूध जेव्हा चहाच्या पावासोबत उकळते आणि उघड्या हवेत ठेवले जाते, तेव्हा दुधातील हेच घटक वर येऊन चहावर साय धरतात.

थोडक्यात सांगायचे तर, पाण्याचे वाफेच्या रूपाने उडून जाणे, उष्णतेमुळे दुधातील घटक हलके होऊन वर सरकणे आणि बाहेरील थंड हवेच्या संपर्कात आल्यामुळे ते एकत्र घट्ट होणे, या तीन गोष्टींच्या एकत्रित परिणामामुळेच दूध किंवा चहावर साय साचत असते. हे साधे दिसणारे विज्ञान आपल्या रोजच्या खाण्यापिण्याच्या सवयींमागे दडलेले असते, जे समजून घेणे मुलांना अत्यंत रंजक वाटते!

अनोळखी देवदूत

कडक उन्हाळ्यात बस स्टॉपवर उभे असलेले रमेश काका एका १५ वर्षांच्या मुलाला अस्वस्थपणे शोधताना पाहतात. विचारपूस केल्यावर तो मुलगा रडत सांगतो, काका, माझी १० मिनिटांत बोर्डाची परीक्षा आहे, पण माझं पाकीट हरवलंय. तिकिटाचे १० रुपये नसल्यामुळे मी परीक्षेला जाऊ शकत नाही, माझं वर्ष वाया जाईल!

रमेश काका क्षणाचाही विचार न करता खिशातून २० रुपये काढतात, त्याला देतात आणि ६ नंबरच्या बसमध्ये बसवून देतात. काका त्याचा नाव-पत्ताही विचारत नाहीत आणि पैसे परत मिळण्याची अपेक्षाही ठेवत नाहीत.

वृद्ध झालेल्या रमेश काकांना अचानक हृदयविकाराचा झटका येतो. त्यांना मोठ्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. पण ऑपरेशनसाठी २ लाख रुपये नसल्यामुळे त्यांचा मुलगा बिलिंग काउंटरवर हताश होऊन बसतो.

तेवढ्यात हॉस्पिटलचे मुख्य डॉक्टर – 'डॉ. समीर' तिथे येतात. पेशंटचे नाव पाहताच ते लगेच ऑपरेशन सुरू करायला लावतात. रमेश काकांचे डॉक्टर पैसे न घेता यशस्वी ऑपरेशन करतात. काका शुद्धीवर आल्यावर डॉक्टर हात जोडून म्हणतात, काका, १० वर्षांपूर्वी बस स्टॉपवर ज्या मुलाचं पाकीट हरवलं होतं, तो मीच! तुमच्या त्या १० रुपयांच्या मदतीमुळे मी परीक्षेला बसलो आणि डॉक्टर बनलो. आज मी फक्त तुमच्या मदतीचे ऋण फेडले आहे.

बोध : कोणतीही अपेक्षा न ठेवता अनोळखी व्यक्तीला केलेली लहानशी मदत कधीही वाया जात नाही. आपण पेरलेली चांगुलकीच वेळ आल्यावर अनेक पटींनी आपल्याकडे परत येते.

आत्मशक्ति



अनुभूती, तत्त्व, संत महात्म्यांनी केली जाते. अशी ही विद्या मागण्याच्या शक्तिसिद्धीची आहे,तेव्हा हा पवित्र मंत्र मोगा एका महापुरुषाकडून, सद्गुरुकडून अधिमंत्रित व सिद्ध केला जातो. त्यावेळेस त्यात शक्ती निर्माण होते. व ही शक्ती आमचे नाम एकाग्र करून ज्योती आणि श्रुतीचा संपर्क स्थापित करू शकते. अशा ह्या सिद्ध नाम मंत्राचा जप साधकास विघ्नापासून ध्यान करीता कल्याणकारी मदत करतो. त्यामुळे आमचे लक्ष बाह्य जग व शरीरापासून दूर शिवनेत्रावर केंद्रित होते.निरंतर नामस्मरण ध्यान केल्यावर आत्मिक शक्ती देखो त्यामुळे तो देहबुद्धीच्या वर येतो, अंतरीय ज्योति आणि श्रुतींना जोडला जातो व शेवटी चेतन मंडळात पाहतो.

अध्यात्मिक शक्ती

ध्यान अभ्यासामुळे आम्ही हा नवा दुनियेचे दर्शन घेतो. ध्यानाभ्यास शिकल्याने आम्ही त्या मार्गावर चालू लागतो जो आम्हाला दिव्य आनंद, ज्योती आणि प्रेमाच्या कागदापर्यंत घेऊन जातो. १२ अंतरीय ज्योतिर्मय मंडळांची यात्राआमच्या अस्तित्वाला जबरदस्त प्रेमाने लपेटणारी ज्योतिर्मय मंडळे आमच्या अंतर्गत असतात. आम्ही कल्पना करू शकत नाही अशी काही दृश्ये आणि आवाज तेथे आहेत. आमचा विश्वास बसणार नाही असे सुमधुर संगीत अंतरी सतत वाजत आहे. जे बाह्य कर्णेंद्रियाला कोणीही वाजवत नाहीये. हा मंडळांत एकसारखे प्रेम वर्तत असते.

आमच्या आत्म्याला रंग-रूपाचा कल्पनेच्या पलीकडील सुंदर दृश्ये आणि मधुर संगीत अंतरी विद्यमान आहे. जीवनातील सारी दुःखे विसराव्यास लावील असा महाआनंद आणि समाधान ह्याची अंती तेथे आहेत.ज्यांना मृत्यूचा (प्रभू जवळ जाण्याचा अनुभव) अनुभव प्राप्त झाला, अशांनी पृथ्वीवर कधीही पाहिले नाही असे तेज आणि प्रकाश ह्या दुसऱ्या जगात जाताना पाहिले. ह्या जगात आम्ही प्रेम पाहिले त्याच्या कितीतरी अधिक पटीने प्रेम तेथे मिळत असल्याचे ते सांगतात. अंतरी बसलेल्या ह्या साऱ्या गोष्टी आम्ही जेव्हा पाहतो आहे. अशा गोष्टीचे वर्णन डॉ. रेमंड मूडी हांच्या पुस्तकात आले आहे व बॅट रडी आणि अन्य पुष्कळशा लोकांचे अनुभवही हाच गोष्टीकडे संकेत करतात. अशा या अति मंडळात जाण्यासाठी आम्हाला मृत्यूच्या मार्गाच्या अनुभावाची गरज नाही तर ध्यानाभ्यासाच्या माध्यमाद्वारे ही आम्ही हे अनुभव घेऊ शकतों. (क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : पालक आणि मुले ह्या नात्याविषयी ही चर्चा मला खूपच रंजक वाटतीय. मी आजोबा झाल्यापासून खूप नवीन अनुभव घेतोय. आमचं नातवंड आम्ही दोघांपैकी कोणावर जास्त प्रेम करते याची आम्हा उभयतांमध्ये गोड स्पर्धा चाललेली असते. समुद्र त्यातील सरस आणि आईवडील यांच्याकडून लहान मुलांमध्ये स्पर्धेची जाणीव शिवायची जाणीवची शक्यता असावी.

शिवानीदिदी : गोड स्पर्धा असं काही नसतं.

सुरेश ओबेरॉय : आई आणि वडील यांपैकी तुझं कोणावर जास्त प्रेम आहे? असं अनेकदा पालकच मुलांना विचारतात.

शिवानीदिदी : हे खूप नुकसानदायक आहे. ह्याच्यामध्ये काहीच चांगलं नाही कारण असं बोलून आपण मुलांना कमी प्रेम करणं, जास्त प्रेम करणं अशा संज्ञा शिकवतो. नाही तर अशा गोष्टी मुलांच्या गावीही नसतात.

सुरेश ओबेरॉय : हो, हे खरंच खरं वाईट आहे. मला कधीच जाणवलं नाही.

नाती घट्ट विणू या

शिवानीदिदी : प्रत्येक बोलल्या जाणाऱ्या गोष्टी मुलांच्या बाबतीत प्रत्यक्षात उतरू शकतात. जेव्हा पालक मुलांना त्यांच्याविषयी कोण जास्त आवडतं असं विचारतात तेव्हा प्रत्यक्षात या स्पर्धेला सुरुवात कोण करतं? प्रत्येकाचा प्रवास वैशिष्ट्यपूर्ण!

सुरेश ओबेरॉय : नवरा आणि बायको.

शिवानीदिदी : हो, ही स्पर्धा सासू-सुनांमध्येही असू शकते.

सुरेश ओबेरॉय : आम्ही ओबेरॉय आणि नोकरवर्ग अशीही स्पर्धा असू शकते.

शिवानीदिदी : हो, सगळेच हा संस्कार खूप सूक्ष्म असतो. आपल्याला वाटतं की, स्पर्धा फक्त कामाच्या ठिकाणी, व्यावसायिक जगात असते किंवा समाजात प्रतिष्ठा सर्व स्थान मिळवणं या इर्ष्येने ढकललेली असते. पण घरातही सूक्ष्म स्तरावर स्पर्धा असू शकते. जसं तुम्ही म्हणाला तसं, मूल कोणावर जास्त प्रेम करतं किंवा त्याची काळजी कोण जास्त चांगली घेते, इ. साठी स्पर्धा असू शकते. मी इतरांपेक्षा जास्त चांगल्या प्रकारे कार्य करू शकते, असा विचार जेव्हा आपण करतो त्या क्षणी आपण चांगली ऊर्जा निर्माण करत नाही, सूक्ष्मपणे आपण आपली आणि इतरांची प्रेमाची ऊर्जा रोखतो.

एका महिलेने मला एकदा सांगितलं की तिचा संपूर्ण दिवस मुलाची काळजी घेण्यात जातो पण तिच्या नवऱ्याने कधीच तिच्या काहीही किंमत केली नाही. एक दिवस जेव्हा नवऱ्याने मुलाची काळजी घेऊन बघतो असं सांगितलं तेव्हा, 'आता बघू या साखळ कसं करतो,'

असा तिने स्वतःशी विचार केला. त्याला या कामात कशा मिळू नये म्हणून त्याला तिने चुकीचं करेल असा विचार तिने नकळत केला होता. तिच्या नवऱ्याची आणि मुलामध्ये तिने कोणत्या प्रकारची ऊर्जा निर्माण केली? कुटुंबातील सदस्य नकळतपणे अशा प्रकारची स्पर्धा करतात.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

सर : बंड्या सांग बरं... तुझ्याकडे ५ पुरणपोळ्या आहेत आणि मी तुझ्याकडून ५ पोळ्या काढून घेतल्या, तर तुझ्याकडे काय उरेल?

बंड्या : फक्त गुळवणी आणि कट!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीचे मुख्यालय कोणत्या देशात आहे?
– व्हिएन्ना, ऑस्ट्रिया

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भवतीच्या पहिल्या तपासणीत वजन घेतल्यावर महिन्याच्या प्रत्येक तपासणीत डॉक्टर गर्भवतीच्या वजनाची नोंद करत असतात. गर्भवतीचे वजन व्यवस्थित वाढत नसेल, तर डॉक्टर त्याबद्दल मार्गदर्शन करतात. वजनाप्रमाणेच गर्भवती स्त्रीचे रक्तप्रमाण, रक्तदाब, नाडीपरीक्षण, हृदय फुप्फुस परीक्षा, स्तनाचा आकार व ठेवण, स्तनाग्रांची ठेवण, याचेही परीक्षण डॉक्टर करतात, कारण पहिल्या खेपेमध्ये बऱ्याचशा स्त्रियांची स्तनाग्रे खोलगट असतात. गर्भवती स्त्रीने बाळाला जन्म दिल्यावर नवजात बालकाला स्तनपान करायचे असते; म्हणून स्तनपान करताना त्रास होऊ नये याकरिता स्तनाग्रे लहान असतील, तर अंघोळीच्या वेळेला हलक्या हाताने मधुर औषधांनी युक्त अशा तेलाने मसाज करून स्तनाग्रे पुढे ओढावीत.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भवतीच्या उदरपरीक्षणामध्ये डॉक्टर गर्भाशयाची उंची, गर्भाची हालचाल, गर्भाचे ठोके. पूर्वीच्या शस्त्रक्रियेचा व्रण याचे परीक्षण करतात. गरज वाटल्यास योनीमार्गाद्वारे डॉक्टर तपासणी करतात. योनीमार्गाद्वारे तपासणी केल्याने गर्भधारणा आहे किंवा नाही हे निदान होते. तसेच चुकलेल्या पाळीच्या तारखेपासून आतापर्यंत झालेली बाळाची वाढ बरोबर आहे किंवा नाही हे समजते तसेच योनीमार्गातील आजारांचे निदान होते. प्रसूतीची तारीख ठरविण्याची पद्धत : शेवटच्या पाळीच्या पहिल्या दिवसापासून नऊ महिने व सात दिवसांनी प्रसूती होईल असा साधारणतः अंदाज डॉक्टर देतात.

गर्भावस्थेत गर्भवतीला कौटुंबिक आधार

गर्भावस्थेत गर्भवतीमध्ये शारीरिक व मानसिक बदल वारंवार घडत असतात चिडचिड करणे, उगाचच रागावणे, छोट्याशा कारणावरून डोळ्यात पाणी येणे, एकदम हताश झाल्यासारखे वाटणे, नैराश्य येणे, भीती वाटणे, अबोला धरणे या सर्व गोष्टी गर्भवतीच्या बाबतीत सामान्य आहेत. अशा अवस्थेत गर्भवती स्त्रीला कौटुंबिक आधाराची गरज असते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्बीकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

५ नोव्हेंबर रोजी वसुबारस साजरी करावी

वसुबारस हा अत्यंत महत्त्वाचा पहिला दिवस वसुबारस ५ नोव्हेंबर रोजी साजरी करावी. हा दिवस आश्विन कृष्ण द्वादशीला साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व आणि पूजेची माहिती.

वसुबारस म्हणजे काय आणि त्याचे महत्त्व

गोमाता आणि वासराची पूजा: 'वसु' म्हणजे द्रव्य (धन) आणि 'बारस' म्हणजे द्वादशी तिथी. या दिवशी गाय आणि तिच्या वासराची पूजा करावी. पौराणिक कथेनुसार, समुद्रमंथनातून ५ कामधेनु (इच्छा पूर्ण करणाऱ्या गायी) उत्पन्न झाल्या होत्या, त्यापैकी 'नंदा' नावाच्या गायीला उद्देशून हा सण साजरा केला जातो. या दिवशी गायीची पूजा केल्याने घरात सुख, समृद्धी आणि लक्ष्मीचा वास राहतो, अशी श्रद्धा आहे.

दिवाळीतील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजेच लक्ष्मीपूजन रविवार, यंदा दोन दिवस अमावस्या आहे रविवार व सोमवार तथापि ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी लक्ष्मीपूजन करावे. दिवाळी हा दिव्यांचा, आनंदाचा आणि मांगल्याचा सण आहे. हा सण अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा उत्सव मानला जातो. हिंदू पंचांगानुसार लक्ष्मीपूजनाची अमावस्या ८/११/२०२६ आहे.

लक्ष्मीपूजन हे नेहमी आश्विन (किंवा कार्तिक) अमावस्येच्या दिवशी प्रदोष काळात (सूर्यास्तानंतर) केले जाते. ८ नोव्हेंबर अमावस्या तिथी प्रारंभ : ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:२७ वाजता

अमावस्या तिथी समाप्ती : ९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२:३१ वाजता

पूजेचा मुख्य शुभ मुहूर्त (प्रदोष काळ): संध्याकाळी ५:५४ ते रात्री ७:५० च्या दरम्यान तुम्ही लक्ष्मीपूजन करू शकता.

दिवाळीच्या पाचही महत्त्वाच्या दिवसांचे महत्त्व आणि शुभ मुहूर्त खालीलप्रमाणे आहे.

१. धनत्रयोदशी (६ नोव्हेंबर) : या दिवशी धन्वंतरी जयंती साजरी केली जाते. आयुर्वेदाचे दैवत भगवान धन्वंतरी प्रकट झाले होते, म्हणून आरोग्याची पूजा केली जाते. या दिवशी नवीन भांडी, दागिने किंवा सोन्या-चांदीची खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते.

२. नरक चतुर्दशी (७ नोव्हेंबर) : या दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासूर नावाच्या राक्षसाचा वध करून लोकांना त्याच्या त्रासातून मुक्त केले होते. या दिवशी पहाटे ब्रह्म मुहूर्तावर पहाटे चार ते सूर्योदय होण्यापूर्वी लवकर उठून सुवासिक तेलाने आणि उटण्याने 'अभ्यंगस्नान' करावे.

३. लक्ष्मीपूजन (८ नोव्हेंबर) : हा दिवाळीचा मुख्य आणि सर्वांत महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी माता लक्ष्मी आणि भगवान गणेश यांचे पूजन सायंकाळी करावे. असे मानले जाते की, या दिवशी मध्यरात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर संचार करते आणि जिथे स्वच्छता, प्रकाश अन् भक्ती असते तिथे ती निवास करते.

४. दिवाळी पाडवा / बळीप्रतिपदा (९ नोव्हेंबर) : हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी भगवान विष्णूने वामन अवतार घेऊन बळीराजाला पाताळात पाठवले होते. व्यापारी लोक या दिवशी नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात करतात आणि पती-पत्नीच्या नात्यातील प्रेमाचा हा दिवस मानला जातो.

५. भाऊबीज (१० नोव्हेंबर) : हा भाऊ आणि बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण आहे. या दिवशी यमराज आपली बहीण यमुनेच्या घरी जेवायला गेला होता, म्हणून याला 'यमद्वितीया' देखील म्हणतात. बहीण भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते.

लक्ष्मीपूजन कसे करावे (थोडक्यात विधी)

१. घराची स्वच्छता व सजावट : पूजेपूर्वी घर स्वच्छ करून मुख्य दारासमोर सुंदर रांगोळी काढावी आणि दाराला तोरण लावावे.

२. एका पाटावर किंवा चौरंगावर लाल किंवा पिवळे वस्त्र अंथरून त्यावर अक्षतांचे स्वस्तिक काढावे. त्यावर माता लक्ष्मी आणि भगवान गणेशाची मूर्ती/चित्र स्थापित करावे (गणपतीची मूर्ती लक्ष्मीच्या उजव्या बाजूला असावी). शेजारी पाण्याचा कलश ठेवावा. सर्वप्रथम गणेशाची पूजा करावी. त्यानंतर माता लक्ष्मीला हळद-कुंकू, अक्षता, कमळाचे फूल किंवा लाल फुले आणि दूर्वा अर्पण कराव्यात. धने, गूळ, साळीच्या लाह्या आणि बत्तासे यांचा प्रसाद नैवेद्य ठेवावा आणि वही-खाते किंवा पैशांची (नाण्यांची) पूजा करावी. शेवटी लक्ष्मी मातेची आरती करावी आणि घराच्या सर्व कोपऱ्यांत, दारात तेलाचे/तुपाचे दिवे लावावेत. धनत्रयोदशी ६ नोव्हेंबर या दिवशी सकाळी आठ ते साडे अकराच्या वेळेत नवीन डायरी, वही, बिल बुक आणि पेन खरेदी करुन घरी किंवा दुकानात आणून ठेवावे.

– ॲड. सचिन देवा पाठक गुरुजी, मो. ९५१११११११६२.

अनामप्रेम संस्थेच्या कार्यकारिणीची निवड

नगर – दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि रोजगारासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा निंबळक येथे पार पडली. यात नवीन विश्वस्त मंडळाची सर्वानुमते निवड करण्यात आली. या सभेमध्ये संस्थेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील वाटचाल, विविध उपक्रम आणि संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करावयाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

संस्थेच्या कार्याला अधिक गती देण्यासाठी तसेच आगामी काळातील विविध उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सन २०२६-२०३१ या कालावधीकरिता नवीन विश्वस्त मंडळाची निवड करण्याचा विषय सभेत मांडण्यात आला. यावेळी उपस्थित सभासदांच्या संमतीने विश्वस्त मंडळावर सर्वानुमते निवड करण्यात आली. यात अजित माने, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, गोपीनाथ सरफरे, अनिल गावडे, राधा मिलिंद कुलकर्णी, डॉ. सायली सोमण, नितीन थाडे, सी. ए. अशोक पितळे, डॉ. रवींद्र सोमाणी, अविनाश बोपर्डीकर, श्याम आसावा डॉ. मेघना मराठे, जे. आर. मंत्री, डॉ. धनंजय वाघ यांचा समावेश आहे.

दिव्यांग व्यक्तींमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांना स्वावलंबी आणि सन्मानपूर्ण जीवन जगण्यासाठी सक्षम करण्याच्या अनामप्रेमच्या ध्येयाला नवीन विश्वस्त मंडळाच्या माध्यमातून अधिक बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

प्रेरणादायी अक्षरधन

गरज मानसिक क्रांतीची





सत्ता कुणाची कायम टिकली? काल आली, आज गेली. पण ज्या कुणाला सत्ता मिळाली, त्यानं तिला क्रांती म्हटलं ? लोकांनीही त्याला हो म्हटलं. सत्ता संपणे म्हणजे क्रांती होणे ? छे सत्ता कायमच असते. तिच्यावरची मालकी बदलते. एखाद्याच्या खालावत गेलेल्या आचारणामुळे तसे घडते. पण मालकी आली की, खालावणे येते. मग पुन्हा मालकी संपते. जिभेवरचे अमृत मालकी मिळवते. पण हृदयातील हालाहल ती घालवते. सत्तेची नशा चढते. ती दुर्वर्तनी बनवते. अमृतदत्त नावाचे एक कवी म्हणतात. कसं म्हणायचं, की अमृत निघालं समुद्र मंथनातून ? ते प्राशन केले देवांनी? विष निघाले ते शंकराने घेतले, हे तरी कसे खरे म्हणायचे? पाहा ना, एखाद्या सत्तेवर असलेल्या दुष्टाकडे ओठात अमृत. पण अंत:करणात विष जाणवतेच. अहर्निश दुष्ट माणूस बोलतो गोड. पण त्याच्या क्रौर्याला नसते तोड. पण भले भले देखील पुरवतात अशांचे कोड. सत्तेची ही खोड सगळ्या सत्प्रवृत्तीची ती करते तोडफोड.

एकदा एखाद्या दुष्टाचे फावले, ते सत्प्रवृत्तींनादेखील भोवले. केवळ स्वार्थापोटी मग सज्जनही दुष्ट बनले. जसे कोळशाच्याच्या संगतीत शुभ्र पांढरे काळे. हा सज्जन पश्चातापाने जळे, रोडावला अस्वस्थतेमुळे, सदा दु:खाच्याच गर्तेत लोळे, मग का दुष्टांना साथ द्यायची ? न कळे तेव्हा अरे माणसा, सत्ता बदलली म्हणजे झाली क्रांती, ही मुझी भ्रांती. सत्तेत नव्हे, तर माणसाच्या वृत्तीत बदल होणे हीच म्हणायची क्रांती. स्वार्थ टाकून लोकांना सुखी केल्याशिवाय घ्यायची नाही विश्रांती. लोकांना मग लाभली समृद्धी, की तिला म्हणायचं उत्क्रांती. राज्यक्रांती, हवी मानवाची उत्क्रांती.

याची गोष्ट ऐका. रशियात झाली राज्यक्रांती. मग स्टॅलिटन गेले, क्रुश्चेव्ह आले. त्याच्या कार्यकारी परिषदेच्या पहिल्याच सभेत ते म्हणाले, स्टॅलिनसारखा क्रूर सत्ताधीश नाही झाला. केवळ संशयावरुन त्याने एकेकाला मारले. साम्यवादाच्या विरोधात ब्र काढला, की त्याचा प्राण गेलाच समजा. स्टॅलिनने एक कोटी रशियन मारले असे. आता क्रुश्चेव्ह आल्यावर कसे ? त्या सभेत कुठून तरी आवाज आला. क्रुश्चेव्ह तुम्ही तेव्हा स्टॅलिनच्या कार्यकारी परिषदेत होतात. ही कत्तल स्टॅलिननं केलीय हे तुम्हाला माहिती होतं. मग तेव्हा का नाही बोललात? आता स्टॅलिन गेल्यावर बोलताहात ?

क्रुश्चेव्ह ताडकन म्हणाले, कोण बोललंय हे ? उभे राहावे त्याने.. चेहरा पाहू देत त्याचा. आणि कुणीही उभे राहिले नाही.

क्रुश्चेव्ह म्हणाले, मिळालं ना माझ्या प्रश्नाचं उत्तर ? की स्टॅलिन जिवंत असताना का नाही बोलू शकली ते?

बोलणारा उभा राहिला तर उद्या काय होईल त्याचे, हे कळले. म्हणूनच ना कुणीही उभे राहिले ? स्टॅलिन काय नि क्रुश्चेव्ह काय ? सत्तेवर आले की एकसारखेच राज्यक्रांती झाली तरी मानसिक प्रवृत्ती कुठं बदलली होती ? निर्भयता आणि सामान्य लोकांची समृद्धी साधायची, तर हवी माणसाच्या वृत्तीत आणि प्रवृत्तीत क्रांती. नव्हे सत्तांतराने घडणारी राज्यक्रांती. म्हणूनच नको भाषा केवळ क्रांतीची, डोळ्यापुढे असावी मानवाची उत्क्रांती.

– किशोर गांधी

यंदाची धनत्रयोदशी 'वनत्रयोदशी' म्हणून होणार साजरी; वनसंरक्षणाचा संकल्प

अहिल्यानगरातून 'हरित श्रीमंती'ची देशव्यापी हाक

नगर – यंदाची धनत्रयोदशी 'वनत्रयोदशी' म्हणून साजरी करण्याचे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने केले आहे. ६ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगरच्या हुतात्मा स्मारकात दोन्ही संघटनांच्या वतीने वनत्रयोदशी साजरी होणार असून, तेथून 'हरित श्रीमंती'चा देशव्यापी संकल्प जाहीर केला जाणार आहे.

सह्याद्रीची दाट जंगले, त्यांतून उगम पावणारे झरे, सुपीक माती आणि वन्यजीवांची विविधता ही देशाची 'हरित श्रीमंती' आहे. पाणी, अन्न आणि निवारा देणारी ही नैसर्गिक संपदा जपणे ही माणसासह जीवसृष्टीच्या अस्तित्वाची अट आहे, अशी भूमिका संघटनांनी मांडली. सह्याद्रीतील नैसर्गिक जंगलांची तोड थांबवून पाणलोट क्षेत्रे, झरे आणि वन्यजीवांचे अधिवास सुरक्षित करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने २७ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी १५ डिसेंबर २०२६ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यापूर्वी नामंजूर झालेल्या दाव्यांचीही फेरतपासणी केली जाणार आहे. संबंधित दावेदारांना नामंजुरीची कारणे समजावून सांगून अतिरिक्त पुरावे आणि आपले म्हणणे सादर करण्याची संधी देण्याचे निर्देश आहेत. अशा दावेदारांनी जुना आदेश व उपलब्ध पुरावे घेऊन संबंधित वनहक्क समितीकडे फेरतपासणीसाठी लेखी पाठपुरावा करावा, असे आवाहन संघटनांनी केले.



वनहक्क अधिनियम, २००६ अंतर्गत पात्र अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी कुटुंबांच्या ताब्यातील, निवासासाठी किंवा उपजीविकेच्या शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या वनजमिनीवरील हक्कांना कायद्यानुसार मान्यता द्यावी. प्रलंबित दाव्यांवर वेळेत निर्णय घेऊन दावे मंजूर झालेल्या कुटुंबांना वनहक्कपत्रे आणि संबंधित महसुली अभिलेख द्यावेत, अशी मागणी दोन्ही संघटनांनी केली.

मानवी कृतींमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्याच पार्श्वभूमीवर, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात नैसर्गिकरीत्या उद्भवणारा 'एल निनो' भारताच्या मान्सूनच्या पावसावर परिणाम करू शकतो. वाढती उष्णता आणि पावसातील अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी जंगले व जलस्रोतांचे रक्षण तातडीचे आहे, असे संघटनांनी म्हंटले आहे.

ग्रामसभा, वननिवासी, शेतकरी आणि नागरिकांनी या दिवाळीत आपापल्या गावात वनत्रयोदशी साजरी करावी, स्थानिक जंगले व जलस्रोत जपण्याचा संकल्प करावा आणि पात्र वनहक्क दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी एकत्र पाठपुरावा करावा, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने केले आहे. या अभियानासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, ज्ञानेश्वर चांदणे, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले आदी प्रयत्नशील आहेत.



ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ देण्यात आली.

ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतली प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ

नगर – महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी यावर्षी प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी विद्यार्थ्यांना प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली.

दिवाळी हा आनंदाचा सण आहे. दिवाळीला यापूर्वी सर्वजण मोठ्या प्रमाणात फटाके वाजवत होते. पण आज परिस्थिती बदलली आहे. आज फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणावर हवा प्रदूषण व ध्वनी प्रदुषण होते. त्यामुळे संपूर्ण पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. फटाक्यांच्या ज्वलनातून विषारी वायू हवेत पसरतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषित होते. या प्रदुषित हवेमुळे श्वसनाचे वेगवेगळे आजार होतात. तसेच मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदुषण होते. त्यामुळे आपल्या कानांना धोका निर्माण होतो. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करुया, असे आवाहन मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच महाराष्ट्रात यावर्षी दुष्काळ पडलेला आहे. त्यामुळे फटाके खरेदीचे वाचलेले पैसे सर्वांनी मिळून एकत्र करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना देण्याचा सर्वांनी संकल्प केला.

यावेळी सहशिक्षिका वृषाली गावडे यांनी विद्यार्थ्यांना दिवाळी सणाविषयी माहिती दिली.

सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांची प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ

फटाक्यांना नकार, पर्यावरण संवर्धनाचा स्वीकार!

नगर – दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण! मात्र, या आनंदोत्सवात फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश केडगाव येथील सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दिला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेत 'प्रदूषणमुक्त दिवाळी' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली.





पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश केडगाव येथील सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दिला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच त्याचे मानवी आरोग्य, पशुपक्षी आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच पशुपक्ष्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सण साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि निसर्गाचा विचार करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता दिवे, पणत्या आणि पर्यावरणपूरक सजावटीच्या माध्यमातून दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. तसेच वृक्षांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करणे, याबाबतही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित उपक्रम नसून पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रेरित करावे. निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये दिवाळी कार्निवल उत्साहात

चिमुरड्यांसह पालकांचा प्रतिसाद

नगर – सणांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीची लहान मुलांना खूप उत्सुकता असते नवीन कपडे, फटाके, गोडधोड फराळ, रंगीबेरंगी आकाश कंदिल, पणत्या, सजावट आणि सुटीची धमाल मस्ती याचे आकर्षण असते. लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत आयोजित दिवाळी कार्निवल मध्ये चिमुरड्यांनी पालकांसह दिवाळीचा हाच उत्साही माहोल अनुभवला. बोरा एजन्सीचे आनंद बोरा यांच्या हस्ते दीपावली पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या संचालिका मनिषा बोगावत, संचालक विशाल बोगावत यांच्यासह सारसनगर, नवलेनगर, ईमारत कंपनी, धर्माधिकारी मळा या चारही शाखांचे विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.



लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये दिवाळी कार्निवल उत्साहात साजरा झाला.

मुलांना नाविन्यपूर्ण उपक्रमातून भारतीय संस्कृती, सण उत्सवांची ओळख करून देण्यासाठी लिटिल फ्लॉवर प्री स्कूल नावाजले जाते. यंदाच्या दिवाळीत शाळेतील मुलांनी शिक्षकांच्या मदतीने स्वत:च्या हातांनी आकर्षक पणत्या, आकाशकंदील, तोरण, सजावटीच्या वस्तू तयार केल्या. त्याचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. पालकांनीही मुलांच्या कलाकृतींचे कौतुक करून या वस्तू खरेदी करत मुलांना प्रोत्साहन दिले. कार्निवलमध्ये मुलं आणि पालकांनी विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर जाऊन मनसोक्त आस्वाद घेतला. यावेळी पपेट शोद्वारे मुलांसमोर संपूर्ण रामायण कथा आकर्षक पद्धतीने सादर करण्यात आली. कार्निवल निमित्त आयोजित दिवाळी पूजा थाली सजावट स्पर्धेत महिलांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक खुशाली पटेल, द्वितीय क्रमांक प्रिया कोठारी, तृतीय क्रमांक सुरभी भळगट, उत्तेजनार्थ बक्षीस भाविका नारंग, अनिता चोरडिया यांना मिळाले. आनंद बोरा यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. शाळेची माजी विद्यार्थिनी अस्मि आनंद बोरा ही एमबीबीएस उत्तीर्ण होऊन आता छत्रपती संभाजीनगर येथे एम.एस.चे शिक्षण घेत आहे. या कामगिरीबद्दल तिचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मनिषा बोगावत यांनी सांगितले की, दिवाळीचा आगळावेगळा आनंदी सोहळा या उपक्रमामुळे सर्वांनी अनुभवला. विविध वस्तू तयार करताना मुलांमधील सृजनशीलता दिसून आली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सणाचा आनंद ओसंडून वाहत होता. शाळेच्या चारही शाखांमध्ये नवीन वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच दिवाळीनंतर मदर टॉडलर सुरू होत आहे.

प्रवेशासाठी पालकांनी ९८८१९ ४५७८२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. विशाल बोगावत यांनी आभार मानले.



अहमदनगर मर्चंटस को. ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल नितीन भंडारी यांचा सत्कार करताना सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा मार्केट यार्ड येथील व्यापारी शांतीलाल गुगळे. यावेळी उपस्थित मर्चंटस बँकेतील स्टाफ.

निवृत्तीवेतनधारक, कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांना आवाहन

नगर – जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतन धारकांना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ चा नियम ३३५ अन्वये दरवर्षी माहे नाव्हेंबर मध्ये निवृत्तीवेतन धारकांनी हयातीचा दाखला देणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगर मार्फत सर्व निवृत्तीवेतन/कुटूंबनिवृत्तीवेतन धारकांच्या याद्या संबधित बँकांकडे हस्तांतरीत करणेत आलेले आहेत. तरी आपण निवृत्तीवेतन घेत असलेल्या बँकेमध्ये जाऊन हयातीचे प्रमाणपत्र सादर करणेसाठी यादीमधील आपले नावासमोर स्वाक्षरी करावी. बँकेमध्ये जाताना आपले आधारकार्ड, पॅनकार्ड सोबत घेऊन जावे.

तसेच निवृत्तिवेतनधारकांसाठी डिजिटल जीवन निवृत्तिवेतनधारकांनी स्मार्टफोनमध्ये गुगल प्ले स्टोअरवरून Aadhaar FaceRd आणि प्रमाणपत्र अभियानांतर्गत Jeevan Pramaan ही ॲप्स डाउनलोड करावीत. त्यानंतर आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी नोंदवून मोबाईलवर प्राप्त ओटीपी प्रविष्ट करावा. पुढे नाव, पीपीओ क्रमांक, पेन्शन खाते क्रमांक आणि पेन्शन देणाऱ्या बँकेचे किंवा संस्थेचे नाव अचूक भरावे. मोबाईलच्या फ्रंट कॅमेऱ्यासमोर चेहरा धरून डोळ्यांची उघडझाप केल्यावर चेहरा पडताळणी पूर्ण होईल. प्रक्रिया यशस्वी झाल्यावर डिजिटल जीवन प्रमाणपत्र जमा होऊन मोबाईलवर प्रमाण आयडीचा एसएमएस प्राप्त होईल.

वरील प्रमाणे निवृत्तीवेतन धारकांनी हयातीच्या दाखल्याची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाने केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.





आधार आपुलकी फाउंडेशनने सुरू केलेल्या 'परिपूर्ण' उपक्रमांतर्गत यंदा दिवाळी फराळाचे उद्घाटन करण्यात आले.

आधार आपुलकी फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम; फराळ निर्मितीतून महिलांना रोजगाराची संधी

नगर – महिलांच्या हाताला काम, त्यांच्या पाककलेला बाजारपेठ आणि कष्टांना योग्य मोबदला मिळावा, या सामाजिक उद्देशातून आधार आपुलकी फाउंडेशनने सुरू केलेल्या 'परिपूर्ण' उपक्रमांतर्गत यंदा दिवाळी फराळ निर्मितीचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. घरगुती चवीचा, पारंपरिक पद्धतीने तयार केलेला आणि आपुलकीचा गोडवा जपणारा दिवाळी फराळ तयार करण्यासाठी फाउंडेशनच्या महिला सभासद पुढे आल्या असून, त्यांच्या कौशल्याला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

आधार आपुलकी फाउंडेशनने वर्षभरापूर्वी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी 'परिपूर्ण इंडस्ट्रीज प्रा. लि.' या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले. संस्थेच्या सभासदांमध्ये अनेक महिला विविध खाद्यपदार्थ उत्कृष्ट पद्धतीने तयार करतात. मात्र, त्यांच्याकडे कौशल्य असूनही उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध नसते. ही अडचण लक्षात घेऊन अशा महिलांनी तयार केलेले खाद्यपदार्थ संस्थेच्या माध्यमातून खरेदी करणे आणि तेच पदार्थ ग्राहकांना वाजवी दरात उपलब्ध करून देणे, अशी या उपक्रमाची संकल्पना आहे. त्यामुळे महिलांना रोजगार व उत्पन्नाचे साधन मिळण्याबरोबरच त्यांच्या कौशल्याला हक्काची बाजारपेठ उपलब्ध होत आहे.

यंदाच्या दिवाळी फराळ निर्मितीमध्ये संस्थेच्या सभासद सौ. स्मिता साठये आणि श्रीमती प्रतिभा साबळे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी पारंपरिक पद्धतीने उच्च दर्जाचा दिवाळी फराळ तयार करण्यास सुरुवात केली आहे. घरातील चवीची आठवण करून देणारा फराळ तयार करताना स्वच्छता, गुणवत्ता आणि पदार्थांची अस्सल चव यांना प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांनी केवळ फराळ तयार करण्यापुरते मर्यादित न राहता आपल्या पाककौशल्याच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या प्रयत्नामागील मुख्य हेतू आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ फराळाची विक्री हा उद्देश नसून, महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा आणि त्यांच्या कौशल्याला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. आज दोन महिला या उपक्रमात सहभागी झाल्या असून, भविष्यात आणखी महिलांनी स्वतःचे खाद्यपदार्थ तयार करून या व्यासपीठाशी जोडले जावे, अशी संस्थेची अपेक्षा आहे.

या फराळाची विक्री गुलमोहर रोडवरील 'माय टिफिन' येथे सुरू झाली आहे. ग्राहकांना घरपोहोच फराळ मागविण्याची सुविधाही उपलब्ध आहे. महिलांच्या हाताला काम देणाऱ्या अशा उपक्रमांना नागरिकांनी प्रतिसाद देणे गरजेचे आहे. कारण स्थानिक महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची खरेदी म्हणजे त्यांच्या कष्टांना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीला हातभार लावणे होय.

'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणत आधार आपुलकी फाउंडेशनने महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी उचललेले हे पाऊल सामाजिक सहकार्याचा आदर्श ठरत आहे. अधिक माहितीसाठी ९८२३७७०८१३.

'स्नेहालय' संचलित उत्कर्ष बालभवनमध्ये विद्यार्थ्यांसोबत 'सेवाप्रीत सोशल फाउंडेशन'चा दीपोत्सवाचा आनंदोत्सव



नगर – दीपावली म्हणजे केवळ घराघरांत दिवे लावून रोषणाई करण्याचा सण नव्हे, तर समाजातील गरजू घटकांच्या जीवनात आनंद, आशा आणि संधींचा प्रकाश निर्माण करण्याचा उत्सव आहे. याच सामाजिक बांधिलकीचे सुंदर दर्शन २ नोव्हेंबर रोजी स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवन, कोठला येथे घडले. सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दीपावली शुभेच्छा व इन्व्हर्टर सहयोग कार्यक्रमातून विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला सुविधेच्या रूपाने मोलाची साथ देण्यात आली. या उपक्रमातून सण साजरा करण्यापलीकडे जाऊन सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपण्याचा आदर्श निर्माण झाला. कार्यक्रमाची सुरुवात तेजोमय झाला आजचा प्रकाश या मंगलमय श्लोकाने झाली. रुबीना मॅडम यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली, तर पूजा मॅडम यांनी परिचय करून दिला. सना मॅडम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सिमरन वधवा, प्रेसिडेंट जागृती ओबेरॉय, खजिनदार अर्चना खंडेलवाल यांच्यासह संस्थेच्या संपूर्ण टीमने पुढाकार घेतला. दीपिका मॅडम, शेरिल मॅडम, कल्पना मॅडम, गगन मॅडम, लीना मॅडम, जया मॅडम, निशी मॅडम, स्वीटी मॅडम आणि टीना मॅडम यांची उपस्थिती होती.

पणत्यांच्या रंगांतून फुलली विद्यार्थ्यांची कल्पकता!

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली दिया डेकोरेशन स्पर्धा. कल्पना मॅडम आणि प्रिया मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पणत्या सजविण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी रंग, कलाकुसर आणि कल्पकतेचा सुंदर संगम साधत आकर्षक पणत्या तयार केल्या. या स्पर्धेतून केवळ कलाकौशल्याचे प्रदर्शन झाले नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, आत्मविश्वासाला आणि स्वतःच्या हाताने काहीतरी नवीन निर्माण करण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन मिळाले. उत्कृष्ट कलाकृतींची निवड करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. खरे तर अशा उपक्रमांतून मुलांना केवळ स्पर्धेचा अनुभव मिळत नाही, तर त्यांच्या सुप्त गुणांना ओळखणारे आणि त्यांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ मिळते. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा आनंददायी शैक्षणिक उपक्रमांची नितांत गरज आहे.

इन्व्हर्टरच्या रूपाने शिक्षणाला ऊर्जेची साथ

या कार्यक्रमातील सर्वाधिक महत्त्वपूर्ण सामाजिक योगदान म्हणजे सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने उत्कर्ष बालभवनला देण्यात आलेला इन्व्हर्टर सहयोग. वीजपुरवठ्यातील अडथळ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात किंवा शैक्षणिक उपक्रमांत व्यत्यय येऊ नये, या दृष्टीने हा सहयोग निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. एखाद्या संस्थेला भेटवस्तू देणे आणि त्या संस्थेच्या गरजा समजून घेऊन तिच्या कार्याला पूरक सुविधा उपलब्ध करून देणे, यामध्ये मोठा फरक आहे. सेवाप्रीत सोशल फाउंडेशनने बालभवनाची गरज ओळखून दिलेला हा सहयोग म्हणजे सामाजिक संवेदनशीलतेचे कृतीतून व्यक्त झालेले उदाहरण आहे.कारण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दिलेला प्रत्येक हातभार हा त्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या निर्मितीत केलेली गुंतवणूक असते.

मिठाईसोबत मिळाल्या आपुलकीच्या शुभेच्छा!

कार्यक्रमाच्या शेवटी फाउंडेशनच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांना दीपावलीच्या शुभेच्छा देत त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण साजरे केले. सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. या छोट्याशा आनंददायी कृतीतून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद फुलला. मिनाज मॅडम यांनी आभार मानत सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या सर्व पदाधिकारी, सदस्य, उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

सामाजिक बांधिलकीचा प्रकाश इतरांसाठीही प्रेरणादायी

आजच्या काळात सामाजिक संस्थांचे कार्य केवळ मदतकार्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संधी निर्माण करणारे असणे आवश्यक आहे. आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे अनेक मुलांना पुरेशा शैक्षणिक सुविधा मिळत नाहीत. अशा वेळी सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती आणि स्वयंसेवी संघटनांनी एकत्र येऊन या मुलांच्या पाठीशी उभे राहणे ही काळाची गरज आहे. सेवाप्रीत सोशल फाउंडेशनने दीपावलीच्या निमित्ताने दिलेला इन्व्हर्टर सहयोग आणि विद्यार्थ्यांसोबत साजरा केलेला आनंदोत्सव हा याच विचारांचा प्रत्यय देणारा उपक्रम ठरला. समाजातील अंधार दूर करण्यासाठी प्रत्येकाने एक दिवा लावण्याची गरज असते; मात्र एखाद्या मुलाच्या आयुष्यात शिक्षणाचा दिवा प्रज्वलित केला, तर त्याचा प्रकाश संपूर्ण कुटुंबाचे आणि समाजाचे भविष्य उजळवू शकतो.

जमिनींशी संबंधित प्रलंबित महसुली दावे सहमतीने निकाली काढण्यासाठी अहिल्यानगरमध्ये ५ नोव्हेंबरला सुनावणी कॅम्प व लोक अदालतीचे आयोजन

नगर – महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित प्रलंबित महसुली दावे आपापसातील सहमतीने व जलद गतीने निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येत आहे. अहिल्यानगर तालुक्यासाठी या अभियानांतर्गत ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून तहसील कार्यालय, अहिल्यानगर येथे सुनावणी कॅम्प व लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानात सहभागी होण्यासाठी पक्षकारांकडून अर्ज मागविण्यात येत असून, तालुक्यातील नागरिकांनी पक्षकारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिलदार, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अभियानांतर्गत निकाली काढली जाणारी प्रलंबित प्रकरणे –

१) दरखास्त दावे, २) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार रस्ता केस / वहिवाट दावे, ३) मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ (२) अन्वये रस्ता केस / वहिवाट प्रकरण, ५) अधिकार अभिलेखा संबंधित (७/१२ नोंदी व फेरफार) प्रकरणे

गावातील ज्या पक्षकारांचे वरील प्रकारचे दावे/प्रकरणे प्रलंबित आहेत आणि जे आपापसातील सहमतीने तडजोड करण्यास तयार आहेत, त्यांनी आपल्या क्षेत्रातील ग्राम महसूल अधिकारी किंवा मंडळाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तडजोडनामा करण्यासाठी 'प्रपत्र-अ' भरून ५ नोव्हेंबर रोजी सुनावणी ठेवणेत आलेली आहे.

आपल्या क्षेत्रातील प्रलंबित वाद कोर्ट-कचेऱ्यांचे खटले न वाढवता आपापसातील सामंजस्याने व मोफत निकाली काढण्यासाठी या अभियानाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल प्रशासनाने केले आहे.



कापूरवाडी तलाव कोरडा..... चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाले, त्याचा परिणाम दुष्काळाचे सावट गडद होत आहे. नोव्हेंबर मध्येच अशी परिस्थिती असल्याने तलाव भरण्यासाठी पुढील पावसाची वाट पहावी लागणार आहे. तोपर्यंत प्रत्येकाने पाणी काटकसरीने वापरणे काळाची गरज आहे. (छायाचित्र – विजय मते)

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या अध्यक्षपदी रामनाथ वायकर, मानद सचिवपदी डॉ. दादासाहेब करंजुले

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राच्या अध्यक्षपदी व्ही आर डी ई चे निवृत्त अतिरिक्त संचालक रामनाथ वायकर यांची तर, मानद सचिवपदी प्राध्यापक डॉ. दादासाहेब करंजुले यांची निवड झाली आहे. ही निवड २०२६ ते २०२८ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी असून ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उभयंतांनी पदाची सूत्रे स्वीकारली.

रामनाथ वायकर हे संरक्षण क्षेत्रातील माजी शास्त्रज्ञ असून त्यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेत ३६ वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवा बजावली आहे. श्री. वायकर हे द इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) चे माजी विद्यार्थी आहेत आणि त्यांनी दिल्ली विद्यापीठातून थर्मल इंजिनिअरिंगमध्ये मास्टर ऑफ इंजिनिअरिंग ची पदवी 'प्रथम श्रेणीसह विशेष प्राविण्य' मिळवून पूर्ण केली आहे. संरक्षण क्षेत्रातील ए आर डी ई पुणे, तसेच व्ही आर डी ई मधील प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय प्रकल्पांमध्ये आपले योगदान दिले. ३० जून २०१६ रोजी ते वाहन संशोधन आणि विकास संस्था, अहिल्यानगर येथून 'शास्त्रज्ञ एफ' (अतिरिक्त संचालक) या पदावरून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर, त्यांनी आपल्या कौशल्याचा लाभ सामाजिक व तांत्रिक स्तरावर देत 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया', अहिल्यानगर लोकल सेंटरच्या समितीवर २०१७-२०१९ या सत्रासाठी 'मानद सचिव' म्हणून यशस्वी सेवा दिली.



प्राध्यापक डॉ. दादासाहेब करंजुले २० वर्षांपासून शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगर येथे यंत्र अभियांत्रिकीचे व्याख्याते म्हणून कार्यरत असून कार्यशाळा अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहे. त्यांना चार वर्षांचा औद्योगिक क्षेत्रातील अनुभवही आहे. ते शासकीय तंत्रनिकेतन कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष, तसेच शासकीय अभियंता पतसंस्था अहिल्यानगरचे संचालक आहेत, तसेच त्यांनी रोटरी क्लब मध्ये सचिव, अध्यक्ष, साक्षरता-संचालक, असिस्टंट गव्हर्नर अशी पदे भूषवली आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून यांत्रिकी अभियांत्रिकीमध्ये पीएचडी व एल एल बी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून एम बी ए या पदव्या प्राप्त केल्या आहेत. पूर्वीही त्यांनी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहिल्यानगर केंद्राच्या कार्यकारिणीवर काम केले असून मानद सहसचिव म्हणूनही ते कार्यरत होते.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), या केंद्रीय संस्थेची देश व विदेशामध्ये १२५ हून अधिक केंद्रे आहेत. चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळा, औद्योगिक भेटी, इ. उपक्रमांद्वारे वेगवेगळ्या शाखां-मधील अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संस्था प्रयत्नशील असते व अभियांत्रिकी क्षेत्रात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाला सहकार्य व मार्गदर्शन करते. संस्थेच्या अहमदनगर केंद्रामध्ये ११५० कार्पोरेट व २३०० हून अधिक विद्यार्थी सभासद आहेत. संस्थेद्वारे अभियांत्रिकी विद्यार्थी व सभासदांसाठी विविध उपक्रम राबवले जातात.

नूतन अध्यक्ष रामनाथ वायकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नगर-कल्याण रोडवर संस्थेच्या इमारतीचे प्रगतीपथावर असलेले बांधकाम पूर्ण करणे व सभासद तसेच अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवून इमारतीचा जास्तीत जास्त उपयोग करणे यासाठी आपले प्राधान्य असेल असे स्पष्ट केले. इमारतीचे काम पूर्ण होण्यासाठी सभासदांनी आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन त्यांनी केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचे मावळते अध्यक्ष भारतभुषण भागवत यांनी आपल्या दोन वर्षांच्या कार्यकाळाचा लेखाजोखा सादर केला. सर्वांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर तांत्रिक व्याख्याने, तसेच दोन राष्ट्रीय परिसंवाद, अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आकाशवाणीवर मार्गदर्शन मालिका, तसेच आर्थिक दृष्ट्या संस्था सक्षम करण्याचे प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले.

मावळते मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी नवीन कार्यकारिणी सदस्यांचीही निवड घोषित करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये कृषी अभियांत्रिकीमधून डॉ. अतुल अत्रे, रसायन अभियांत्रिकीमधून प्रकाश गांधी, स्थापत्य अभियांत्रिकीमधून डॉ. अविनाश गारुडकर, अभियंता अजित माने व प्रदीप तांदळे, संगणक अभियांत्रिकीमधून प्रा. प्राजक्ता बिवरे-डोलारे, विद्युत अभियांत्रिकी मधून डॉ. बाबासाहेब खरबस, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधून सुनील पाळंदे, यंत्र अभियांत्रिकीमधून हरिश्चंद्र थिगळे व सागर ससाणे व प्रॉडक्शन अभियांत्रिकीमधून अविनाश मांडे यांचा समावेश आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेला कार्यकारिणी सभासदांव्यतिरिक्त माजी अध्यक्ष मनोहर अणेकर, अविनाश कुलकर्णी, माजी मानद सचिव मधुकर बालटे, राजकुमार मुनोत, सदस्य जी. सी. मोटगी आदि उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीला केंद्राचे माजी अध्यक्ष, श्रायडर इलेक्ट्रिक इंडिया चे माजी उपाध्यक्ष अरविंद पारगावकर, व इतरांनी शुभेच्छा दिल्या.





हरे येथे ४ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून त्यांच्या हक्कांचे, सन्मानाचे आणि सामाजिक हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने 'माऊली ज्येष्ठ नागरिक संघटने'ची स्थापना करण्यात आली. यानिमित्ताने संघटनेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला.

'माऊली ज्येष्ठ नागरिक संघटने'ची स्थापना

देहरे येथे उद्घाटन सोहळा उत्साहात

देहरे – देहरे येथे ४ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून त्यांच्या हक्कांचे, सन्मानाचे आणि सामाजिक हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने 'माऊली ज्येष्ठ नागरिक संघटने'ची स्थापना करण्यात आली. यानिमित्ताने संघटनेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला.

या वेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असून त्यांच्या अनुभवातून नव्या पिढीला योग्य दिशा मिळते. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ समाजाला व्हावा, तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या अडीअडचणी, समस्या व प्रश्नांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या संघटनेची स्थापना करण्यात आली.

संघटनेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक उपक्रम राबविणे, त्यांच्यात एकोपा व आपुलकीची भावना वाढविणे आणि त्यांच्या सन्मानासाठी कार्य करणे, असा मानस व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमामुळे देहरे गावातील ज्येष्ठ नागरिकांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून, संघटनेच्या पुढील सामाजिक वाटचालीस उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

'ज्येष्ठांचा सन्मान, अनुभवाचा आदर आणि समाजहिताचा विचार' या भावनेतून माऊली ज्येष्ठ नागरिक संघटना देहरे येथे नक्कीच उल्लेखनीय कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमामुळे देहरे गावातील ज्येष्ठ नागरिकांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून, संघटनेच्या पुढील सामाजिक वाटचालीस उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य व्ही. डी. काळे, विठ्ठल पटारे, बी. जी. लांडगे, दत्तात्रय काळे, हरिदास करंडे, दत्तात्रय धनवटे, महेश काळे, किरण लांडगे, यादव सोमाजी काळे, अनिल बालवे महाराज, माजी चेअरमन रावसाहेब करंडे, माजी चेअरमन यशवंत काळे, प्रगतिक शेतकरी रघुनाथ करंडे, आप्पासाहेब पिंपळे, ह भ प दत्तात्रय महाराज काळे (शास्त्री), नामदेव डावरे, सुरेश लांडगे, दळवी पाटील आदी उपस्थित होते.

जगातील सर्वात मोठ्या युरॉलॉजी परिषदेत नगरच्या डॉ. स्वानित देशपांडे यांची निवड

भारतातील एकमेव अँड्रोलॉजिस्ट म्हणून सादरीकरणाची इटली येथे संधी



नगर – इटलीतील फ्लॉरेन्स येथे ११ ते १४ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या इंटरनॅशनल युरॉलॉजी सोसायटी (एसआययु) च्या ४६ व्या आंतरराष्ट्रीय युरॉलॉजी परिषदेत अहिल्यानगर येथील युरॉलॉजिस्ट व अँड्रोलॉजिस्ट डॉ. स्वानित देशपांडे यांची व्याख्यानासाठी निवड झाली आहे. या परिषदेत आयोजित ग्लोबल अँड्रोलॉजी फोरमच्या विशेष परिसंवादात सहभागी होण्यासाठी निवड झालेले ते भारतातील एकमेव अँड्रोलॉजिस्ट आहेत.

ही जगातील सर्वात मोठी युरोलॉजी/मूत्रविकार परिषद आहे. जगभरातील युरॉलॉजी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधक एकत्र आणणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत आधुनिक उपचारपद्धती, संशोधनातील प्रगती आणि पुरुषांच्या प्रजनन आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

डॉ. देशपांडे हे फ्लॉरेन्स येथे ११ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या Global Andrology Forum Symposium: Medical Management of Male Infertility - What Works, What Might, What Doesn't या परिसंवादात "Managing Oligo- Astheno- Teratozoospermia Associated with Male Accessory Gland Infections' या विषयावर आपले व्याख्यान सादर करण्यास निमंत्रित केले आहे.

पुरुषांच्या प्रजनन संस्थेतील सहायक ग्रंथींशी संबंधित संसर्ग किंवा दाह. पुरुष वंध्यत्वाच्या निदानामध्ये या समस्यांकडे कसे पाहावे, लक्षणे नसतानाही संभाव्य दाह किंवा संसर्ग कसा ओळखावा आणि योग्य रुग्णांमध्ये उपचारांचे महत्त्व काय, यावर ते स्वतः चे संशोधन सादर करणार आहेत.

या सादरीकरणात डॉ. देशपांडे आपल्या संशोधनाचा अनुभव मांडणार आहेत. या अभ्यासातून पुरुष वंध्यत्वाच्या तपासणीमध्ये अधिक शास्त्रीय आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची गरज अधोरेखित होणार आहे.

डॉ. स्वानित देशपांडे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून (MUHS) एम.सीएच. युरॉलॉजी पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. ते अहिल्यानगर येथील देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि गुडन्यूज आयव्हीएफ सेंटर येथे युरॉलॉजी व अँड्रोलॉजी क्षेत्रात कार्यरत आहेत. पुरुष वंध्यत्व, शुक्राणूंच्या गुणवत्तेचे मूल्यमापन, मायक्रोसर्जिकल व्हेरिकोसीलेक्टॉमी, मायक्रो-टीईएसई आणि पुरुषांच्या प्रजनन आरोग्याशी संबंधित आधुनिक उपचारपद्धती हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय आहेत.

या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतातील पुरुष वंध्यत्वविषयक संशोधन आणि प्रत्यक्ष रुग्णसेवेतील अनुभव मांडण्याची संधी मिळाल्याने अहिल्यानगरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

राष्ट्रीय पॅरा योगासन चॅम्पियन स्पर्धेसाठी दिया जासूदची निवड



नगर – दुसरी महाराष्ट्र राज्य पॅरा योगासन चॅम्पियन स्पर्धा २०२५-२६ नुकतीच २ व ३ नोव्हेंबरला पुणे येथे बालकल्याण संस्थेत पार पडली.

या स्पर्धेत लवकरच होणाऱ्या दुसऱ्या राष्ट्रीय पॅरा योगासन चॅम्पियन स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करण्यात आली. यात टीकाराम जगन्नाथ आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज खडकी, पुणे येथील एम ए ची विद्यार्थिनी कु. दिया राजेंद्र जासूद हिची १७ वर्षांवरील मुलींच्या गटात निवड झाली. त्या बद्दल तिचे अभिनंदन व राष्ट्रीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

जादा काम केल्याने रोखली पदोन्नती!

कॉर्पोरेट जगतात अनेकदा मेहनत आणि चांगली कामगिरी ही पदोन्नतीची गुरुकिल्ली मानली जाते; मात्र कधी कधी उत्तम कामगिरी करणेच आपल्या प्रगतीच्या आड येऊ शकते का? 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'रेडिट'वर एका टेक कर्मचाऱ्याने आपली व्यथा मांडली आहे. त्याच्या कर्तृत्वामुळेच त्याच्या पदोन्नतीचा मार्ग रोखला गेल्याचा दावा त्याने केला आहे.

या कर्मचाऱ्याने मेहनतीच्या जोरावर ३० टक्के पगारवाढ असलेल्या नव्या पदासाठी आवश्यक असलेल्या सर्व निवड प्रक्रियेत यश मिळवले होते; मात्र त्याच्या सध्याच्या व्यवस्थापकाने 'टीममध्ये आधीच मनुष्यबळ कमी आहे,' असे कारण देत त्याची पदोन्नती रोखल्याचे कर्मचाऱ्याने सांगितले. या घटनेची पोस्ट आता 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, कॉर्पोरेट संस्कृतीतील एका कटु वास्तवावर चर्चा सुरू झाली आहे. कर्मचाऱ्याने 'रेडिट'वर आपली कहाणी शेअर करताना सांगितले की, तो गेल्या तीन वर्षांपासून एका मध्यम आकाराच्या टेक कंपनीत काम करत आहे. त्याने आपल्या टीमधील अनेक कामे स्वयंचलित केली. चार नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आणि दरवर्षी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये स्थान मिळवले.

कंपनीत 'सीनिअर प्रॉडक्ट मॅनेजर' पद रिक्त झाल्यानंतर 'हायरिंग डायरेक्टर'ने स्वतः त्याला या पदासाठी अर्ज करण्यास सांगितले. त्यानंतर कर्मचाऱ्याने मुलाखतीच्या तीन कठीण फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण केल्या. त्याला ३० टक्के पगारवाढीसह नव्या पदावर बदली मिळणार होती; मात्र त्याच्या म्हणण्यानुसार, पडद्यामागे त्याच्या व्यवस्थापकाने त्याच्या बदलीला विरोध केला. परिणामी, 'एचआर' विभागाने त्याला देण्यात येणारी ऑफरच रद्द केली. कर्मचाऱ्याचा आरोप आहे की, त्याच्या व्यवस्थापकाने 'एचआर'ला सांगितले की, त्यांच्या टीममध्ये आधीपासूनच कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. संबंधित कर्मचारी टीममधून बाहेर पडल्यास दैनंदिन कामकाज ठप्प होईल, असा युक्तिवाद व्यवस्थापकाने केल्याचे त्याने म्हटले आहे. 'एचआर'ने व्यवस्थापकाच्या भूमिकेला मान्यता देत कर्मचाऱ्याची बदली रोखली. एवढेच नव्हे, तर त्याला पुढील १२ महिने त्याच जुन्या पदावर काम करावे लागणार असल्याचे सांगण्यात आले. ज्या संचालकाने त्याची नव्या पदासाठी निवड केली होती, त्यानेही वैयक्तिकरित्या माफी मागत आपण काही करू शकत नसल्याचे सांगितल्याचा दावा कर्मचाऱ्याने केला. या संपूर्ण प्रकारामुळे आपण स्वतःच्याच कंपनीत जणू 'बंधक' झाल्यासारखे वाटत असल्याचे त्याने 'रेडिट पोस्ट'मध्ये लिहिले.

कॅलिडोस्कोप



'गोलमाल' चित्रपटाच्या डायलॉगवरून वाद

गुजरातमधील अहमदाबाद येथील प्रसिद्ध 'निरमा युनिव्हर्सिटी'मध्ये एका कार्यक्रमादरम्यान प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये झालेला वाद सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. 'गोलमाल' या चित्रपटातील एक प्रसिद्ध डायलॉग मारल्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन विभागाचे विभागप्रमुख डॉ. एच. के. पटेल भडकले आणि त्यांनी विद्यार्थ्याची कॉलर पकडून त्याला कडक इशारा दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, 'निरमा युनिव्हर्सिटी'मध्ये एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रसिद्ध 'स्टँडअप कॉमेडियन' रजत सूद हेदेखील उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान 'इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन' विभागाचे विभागप्रमुख डॉ. एच. के. पटेल हे मंचावरून उपस्थितांना संबोधित करत होते. त्याच वेळी प्रेक्षकांमध्ये बसलेल्या एका विद्यार्थ्याने गंमत म्हणून 'गोलमाल' चित्रपटातील अत्यंत लोकप्रिय असलेला 'जल्दी बोल, सुबह पनवेल निकलना है...' हा डायलॉग मारला.

विद्यार्थ्याची ही टिप्पणी ऐकताच प्राध्यापक पटेल अत्यंत संतप्त झाले. त्यांनी त्या विद्यार्थ्याला तात्काळ मंचावर बोलावून घेतले. मंचावर आल्यानंतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्याची कॉलर पकडली आणि 'शिक्षकांचा अपमान करणाऱ्यांविरुद्ध कोणत्याही थराला जाऊ,' असा इशारा दिला. तसेच कॅम्पसमध्ये शिक्षकांचा अपमान सहन केला जाणार नाही, असे सांगत शिस्तभंगाच्या कारवाईची धमकी दिली.


आत्म्याची खरेदी 33 कोटींना!

पैशाने तुम्ही काहीही खरेदी करु शकता; परंतु एखाद्याचा आत्मा आणि मन खरेदी करू शकत नाही, ही म्हण आता खोटी ठरणार आहे. कारण एका व्यक्तीने तब्बल चार दशलक्ष डॉलर (सुमारे ३३ कोटी रुपये) मोजून तरुणीचा आत्मा खेरदी केला. हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल. या बातमीने स्थानिक प्रसारमाध्यमांपासून 'सोशल मीडिया'पर्यंत हंगामा माजवला. आता या आत्म्याचे नेमके करायचे काय, असा त्याला प्रश्न पडला आहे. एका महिलेने कथितपणे आपला 'आत्मा' विकून सुमारे ३३ कोटी रुपये मिळवले आहेत. या रकमेतून तिने बाहुल्यांचे कलेक्शन आणि कॉन्सर्ट तिकीट खरेदी केले. रशियाच्या सोशल नेटवर्कींग प्लॅटफॉर्मवर एक व्यक्ती दिमित्री यांनी मजेने एक पोस्ट केली होती. त्यात त्यांनी लिहिले होते, की त्यांना आत्मा विकत घ्यायचा आहे. सुरुवातीला लोकांनी ही मस्करी मानली; परंतु लवकरच ही गोष्ट खरी असल्याचे सिद्ध झाले. करिना नावाच्या या तरुणीने ही ऑफर स्वीकारली. हैराण करणारी बाब म्हणजे यथावकाश या दोघांमध्ये रक्ताने लिहिलेला करार झाला. काही दिवसांनी दिमित्री यांनी यासंदर्भातील रक्ताने लिहिलेला करार 'सोशल मीडिया'वर पोस्ट केला. कॅप्शनमध्ये लिहिले की मी आता पहिला आत्मा खरेदी केला आहे. हा करार रक्ताने साईन केला आहे. करिनाने स्थानिया मीडियाला सांगितले, की आत्मा विकल्याचा आपल्याला काहीही पश्चाताप नाही किंवा लोकांच्या टीकेची पर्वा नाही. करिनाने सांगितले, की रक्कम थेट तिच्या बँक अकाऊंटला गेली आणि त्यानंतर करिनाने बाहुल्यांचे कलेक्शन खरेदी केले. तसेच प्रसिद्ध गायिका नादेज़्दा काडिशेवा यांच्या कॉन्सर्टचे तिकीट खरेदी केले. दुसरीकडे दिमित्री यांचे म्हणणे आहे, की त्यांनी मजेत ही ऑफर दिली होती. मला आशा नव्हती. एखादी महिला खरेच ही ऑफर स्वीकारेल. आता मला स्वत:ला कळत नाही की खरेदी केलेल्या आत्म्याचे काय करायचे! ही घटना एखाद्या हॉरर चित्रपटाच्या पटकथेसारखी वाटते. 'सोशल मीडिया'वर अनेक लोकांनी यास सैतानी प्रवृतीशी जोडून टीका केली आहे.




अबब! केवढं हे कासव

कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर डायनासोर नामक महाभयंकर आणि महाकाय प्राण्यांचं अस्तित्व होतं. मात्र हे प्राणी या पृथ्वीतलावरून नामशेष झाले. या डायनासोरचे जीवाश्मही सापडले आहेत. या जीवाश्मांवर शास्त्रज्ञ संशोधन करत असतात. तो काळ उलगडण्याचा प्रयत्न सध्या केला जातो. दक्षिण अमेरिकेतल्या कोलंबियाम धल्या ताताकोआ वाळवंटात असंच एक भलं मोठं जीवाश्म सापडलं. या जीवाश्माचा आकार एखाद्या गाडीएवढा आहे. हे एका कासवाचं जीवाश्म आहे. एवढ्या मोठ्या आकाराचं जीवाश्म बघून शास्त्रज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला. या प्रचंड मोठ्या कासवाची लांबी १३ फूट आणि वजन २.५ टन असावं, असा अंदाज व्यक्त केला गेला. अशी कासवं साधारण १.३ कोटी वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिकेत आढळत असत. या जीवाश्माला 'स्टुपेंडेमी जिग्राफिकस' असं नाव देण्यात आलं आहे. कासवाला शिंगं असल्याचं आपण कधी ऐकलेलं नाही. पण नर स्टुपेंडेमी कासवाच्या कवचाच्या दोन्ही बाजूंना समोरच्या बाजूला शिंगं होती. म्हणजेच ही कासवं किती महाकाय आणि भयंकर असतील याचा अंदाज बांधलेलाच बरा. ही कासवं या शिंगांचा वापर स्वत:च्या सुरक्षेसाठी करत असावीत, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. अर्थात याआधीही स्टुपेंडेमी कासवाचं जीवाश्म सापडलं होतं. १९७० मध्येही असंच एक जीवाश्म सापडलं होतं. पण त्यावेळी या प्रजातीबद्दल फारशी माहिती मिळाली नव्हती. सीगोईंग आर्किलोन हे पृथ्वीतलावरचं सर्वात मोठं कासव होतं. त्यानंतर आकाराच्या बाबतीत स्टुपेंडेमीचा क्रमांक लागतो. सीगोईंग आर्किलोन डायनासोर युगाच्या अंताच्या वेळी म्हणजेच जवळपास सात कोटी वर्षांपूर्वी या पृथ्वीवर अस्तित्वात होते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. एवढी मोठी कासवं पाहिल्यानंतर कोणाच्याही मनात धडकी भरेल.



अमिबा खरोखरच मेंदू खातो का?

मेंदू खाणारा अमिबा खरोखरच मानवी मेंदू खातो का? मेंदू खाणारा अमिबा एक प्राणघातक आजार निर्माण करतो. एकदा संसर्ग झाला, की जगणे अत्यंत कठीण होते. तथापि, हा आजार संसर्गजन्य नाही, म्हणजेच तो एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरत नाही. मानवी शरीरात ३० ट्रिलियनपेक्षा जास्त पेशी असतात, तर अमिबा हा फक्त एक पेशी असलेला जीव आहे. या एकाच पेशीचा वापर करून अमिबा त्याचे अन्न शोधते, ते खातो, पचवतो आणि नंतर त्याचा कचरा बाहेर टाकते. पाण्याच्या साठ्यात आढळणाऱ्या अमिबाच्या एका प्रजातीने मानवांमध्ये आरोग्याची चिंता निर्माण केली आहे. खरे तर, या वर्षी भारतातील केरळ राज्यात 'मेंदू खाणारा अमिबा' या व्याधीची ६५ हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत. त्यामुळे १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. या अमिबाला वैज्ञानिकदृष्ट्या 'नेग्लेरिया फाउलेरी' म्हणून ओळखले जाते. 'यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन' (सीडीसी) च्या वेबसाइटनुसार, मेंदू खाणारा अमिबा गोड्या पाण्यातील तलाव, जलाशय, नद्या, गरम पाण्याचे झरे आणि मातीमध्ये वाढतो. योग्यरित्या देखभाल न केलेले स्विमिंग पूलदेखील या अमिबाच्या प्रजननाचा धोका निर्माण करतात. हा अमिबा असलेल्या पाण्यात आंघोळ करणे अत्यंत धोकादायक आहे. खरे तर आंघोळ करताना हा अमिबा नाकातून शरीरात प्रवेश करू शकतो आणि नंतर



मेंदूपर्यंत पोहोचू शकतो. गेल्या वर्षी मे ते जुलै या कालावधीत केरळमध्ये या व्याधीचे चार रुग्ण आढळले आणि चारही प्रकरणांमध्ये बाधित मुलांचा मृत्यू झाला. या वर्षी नोंदवलेल्या ६७ प्रकरणांपैकी १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. 'सीडीसी'च्या मते १९६२ ते २०२४ दरम्यान अमेरिकेत या आजाराचे १६७ रुग्ण आढळले. आणि त्यापैकी फक्त चारजणच वाचले. या अमिबाबद्दलचा एक अभ्यास गेल्या वर्षी 'यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या वेबसाइटवर प्रकाशित झाला होता. त्यानुसार, अंटार्क्टिका वगळता जगातील प्रत्येक देशात या अमिबाची उपस्थिती नोंदवली गेली आहे. १९६५ ते २०१८ दरम्यान जगभरात फक्त ३८० प्रकरणे नोंदवली गेली. हे खूपच दुर्मिळ आहे; परंतु धोकादायकदेखील आहे. या अभ्यासानुसार, हा अमिबा त्याचे प्रजनन चक्र सुरू असताना मानवांमध्ये प्रवेश करतो. मेंदूत प्रवेश केल्यानंतर, हा अमिबा केवळ मेंदूच्या ऊतींचा नाश करत नाही, तर शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवरही हल्ला करतो. मेंदूतील संसर्गामुळे शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीकडून तीव्र प्रतिक्रिया निर्माण होते. या प्रतिसादामुळे अमिबा मरत नाही; परंतु त्यामुळे मेंदूला तीव्र सूज येते. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये उलट्या, ताप, डोकेदुखी आणि सुस्ती यांचा समावेश होतो. रोग वाढत जातो, तसतसा गोंधळ वाढणे, मान ताठ होणे, प्रकाशाची भीती आणि झटके येणे यासारखी लक्षणे दिसून येतात. 'सीडीसी'च्या मते, बहुतेक लोक लक्षणे दिसू लागल्यानंतर एक ते १८ दिवसांच्या आत मरतात. बळी सामान्यतः प्रथम कोमात जातो आणि नंतर मरतो.


पोलिसांनी कापले काल्पनिक' व्यक्तीचे चालान!



बंगळुरूच्या रस्त्यांवर दररोज वाहतुकीशी संबंधित अनेक विचित्र घटना पाहायला मिळतात; मात्र यावेळी घडलेल्या एका प्रकाराने तंत्रज्ञान आणि वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दोन्ही समोर आणल्या आहेत. कल्पना करा, तुम्ही बाइकवर एकटे प्रवास करत आहात आणि पोलिस तुमच्या मागे बसलेल्या काल्पनिक व्यक्तीचे विनाहेल्मेटचालान कापतात, तर तुम्ही काय म्हणाल? असाच काहीसा प्रकार सौविक दत्ता यांच्यासोबत घडला. बंगळुरू वाहतूक पोलिसांच्या 'हायटेक एआय' कॅमेऱ्यांनी त्यांच्या खांद्यावर लटकवलेल्या गिटारला विनाहेल्मेट असलेला 'पिलियन रायडर' समजले आणि थेट५०० रुपयांचे चालान जारी केले. या मजेदार आणि आश्चर्यकारक घटनेचे छायाचित्र 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे. सौविक आपल्या पत्नीची स्कूटी घेऊन रस्त्यावरून जात होते. त्यांनी स्वत: हेल्मेट व्यवस्थित घातले होते. त्यांच्या पाठीवर एका बॅगमध्ये गिटार लटकवलेले होते; मात्र रस्त्यांवर नजर ठेवणाऱ्या 'एआय'आधारित कॅमेऱ्याने या दृश्याचा वेगळाच अर्थ लावला. कॅमेऱ्याने गिटारच्या बॅगला माणसाचे डोके समजले. त्यानंतर प्रणालीने 'विनाहेल्मेट पिलियन रायडर' या कारणासाठी ५०० रुपयांचे ई-चालान तयार केले. हे चालान थेट सौविक यांच्या पत्नीच्या खात्यावर पाठवण्यात आले. चालान पाहिल्यानंतर दोघांनाही हसू आवरेना आणि या प्रकाराचे आश्चर्यही वाटले. चुकीचे चालान मिळाल्यानंतर सौविक गप्प बसले नाहीत. त्यांनी 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'एक्स'चा आधार घेत चालानचा फोटो आणि संबंधित पुरावे शेअर केले. त्यांनी बंगळुरू वाहतूक पोलिसांना टॅग करत मजेशीर पद्धतीने सांगितले की, ते बाइकवर एकटेच प्रवास करत होते आणि त्यांच्यामागे कोणताही माणूस नव्हता, तर फक्त गिटार होती. चालानसोबत जोडलेल्या छायाचित्रातही हे स्पष्ट दिसत होते की, बाइकवर सौविक यांच्याशिवाय अन्य कोणीही व्यक्ती नव्हती. त्यांच्या पाठीवर केवळ गिटारची बॅग होती.

पुरुषाच्या शरीरात गर्भाशय!

दिल्लीतील २६ वर्षीय विवाहित पुरुषाच्या लग्नाला दोन वर्षे झाली होती; मात्र मूल होत नसल्याने त्याने डॉक्टरांकडे तपासणी केली. या तपासणीदरम्यान डॉक्टरांना त्याच्या शरीरात गर्भाशय आणि फॅलोपियन ट्यूब असल्याचे आढळून आले. या अत्यंत दुर्मिळ वैद्यकीय स्थितीमुळे डॉक्टरांनाही आश्चर्याचा धक्का बसला. या प्रकरणाला 'परसिस्टंट म्यूलरियन डक्ट सिंड्रोम' म्हणजेच 'पीएमडीएस' असे म्हटले जाते.




दिल्लीतील एका खासगी रुग्णालयात या तरुणावर उपचार करण्यात आले. लग्नानंतर दोन वर्षे मूल होत नसल्याने या पुरुषाची इनफर्टिलिटीची तपासणी करण्यात आली. त्यावेळी केलेल्या विविध वैद्यकीय चाचण्यांमध्ये शरीराच्या आत गर्भाशय आणि फॅलोपियन ट्यूब असल्याचे आढळले. विशेष म्हणजे बाहेरून त्याचे शरीर पूर्णपणे पुरुषासारखे दिसत होते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, या व्यक्तीमध्ये पुरुषांच्या शरीराशी संबंधित शारीरिक वैशिष्ट्ये सामान्यपणे विकसित झाली होती. त्यामुळे त्याच्या शरीरात अशी वेगळी रचना असल्याचा कोणताही स्पष्ट संकेत यापूर्वी मिळाला नव्हता. इनफर्टिलिटीची तपासणी झाली नसती, तर ही स्थिती आणखी उशिरा लक्षात आली असती. अशा प्रकारची परिस्थिती अत्यंत दुर्मिळ असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. 'परसिस्टंट म्यूलरियन डक्ट सिंड्रोम' ही जन्मजात आणि अत्यंत दुर्मिळ वैद्यकीय स्थिती आहे.

'नेचर रिव्ह्यू युरॉलॉजी'मध्ये प्रकाशित माहितीनुसार, 'पीएमडीएस' असलेल्या व्यक्तींचे क्रोमोसोम सामान्यतः '४६, एक्सवाय' असतात आणि शरीराचा विकास पुरुष म्हणून होतो; मात्र भ्रूणाच्या विकासादरम्यान 'म्युलरियन डक्ट'मधून तयार होणारे गर्भाशय आणि फॅलोपियन ट्युबसारखे अवयव शरीरातच राहतात. जगभरात आतापर्यंत अशा ३०० पेक्षा कमी प्रकरणांची नोंद झाल्याचे उपलब्ध वैद्यकीय माहितीत नमूद आहे. जानेवारी २०२६ मध्ये 'ग्लोबल जनरल ऑफ सर्जरी एण्ड केस रिपोर्ट्स'मध्ये प्रकाशित एका अहवालात ४८ वर्षीय पुरुषाच्या शरीरात गर्भाशयासारखी रचना आढळल्याचे नमूद करण्यात आले होते. वारंवार लघवी होणे आणि वीर्यामध्ये रक्त येणे यामुळे त्याची तपासणी करण्यात आली होती. 'सीटी स्कॅन'मध्ये ही रचना आढळल्यानंतर शस्त्रक्रियेद्वारे ती काढण्यात आली. त्यानंतर करण्यात आलेल्या 'हिस्टोपॅथोलॉजिकल' तपासणीत ती गर्भाशयाच्या ऊती असल्याचे स्पष्ट झाले.

श्रीमंतीच्या दिखाव्यातून गमावले दागिने

'सोशल मीडिया'वर 'व्ह्यूज' आणि 'लाइक्स' मिळवण्यासाठी आपली श्रीमंती आणि सोन्या-चांदीचा दिखावा करणे तामीळनाडूतील एका प्रसिद्ध यूट्यूबरला चांगलेच महागात पडले आहे. कन्याकुमारी जिल्ह्यातील नागरकोईलजवळ राहणाऱ्या या यूट्यूबरच्या घरात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी मोठी चोरी केली.

चोरट्यांनी त्याच्या घरातून सुमारे ११८ सवरेन सोने आणि मोठ्या प्रमाणात रोख रक्कम लंपास केली. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, 'सोशल मीडिया'वर याला 'दिखाव्याचा कटु धडा' म्हटले जात आहे. ही घटना थम्पाथुकोनम येथील 'व्हीआयपी गार्डन' परिसरातील आहे. येथे प्रसिद्ध यूट्यूबर विनोद कुमार हे पत्नी मधुमिता यांच्यासोबत राहतात. रात्री कुटुंबीय झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराला लक्ष्य केले. चोरट्यांनी घराचा मागील दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरात ठेवलेले सुमारे एक किलो वजनाचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन ते पसार झाले. विशेष म्हणजे, घरातील कोणालाही याची चाहूल लागली नाही. सकाळी चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.



चोरीची माहिती मिळताच राजाक्कमंगलम पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. पोलिसांच्या फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावरून बोटांचे ठसे आणि इतर महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. याशिवाय यूट्यूबरच्या घराभोवती, तसेच परिसरात बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे. चोरट्यांनी घरात कोणत्या मार्गाने प्रवेश केला आणि चोरी केल्यानंतर कोणत्या दिशेने पलायन केले, याचा शोध पोलिस घेत आहेत. चोरीची ही घटना पूर्वनियोजित होती का, चोरट्यांना घरातील मौल्यवान वस्तूंची आधीपासून माहिती होती का आणि या गुन्ह्यात किती जणांचा सहभाग आहे, याचाही तपास केला जात आहे. या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा पोलिसांच्या तपासादरम्यान समोर आला. पोलिसांनी यूट्यूबर दाम्पत्याच्या 'सोशल मीडिया' अकाऊंट्सचीही तपासणी सुरू केली आहे. विनोद कुमार आणि त्यांची पत्नी आपल्या व्हिडीओ आणि 'रील्स'मध्ये मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने परिधान करताना, तसेच नोटांच्या गड्ड्या दाखवताना दिसत होते. त्यामुळे चोरट्यांनी हे व्हिडीओ पाहून त्यांच्या घरात मोठ्या प्रमाणात मौल्यवान वस्तू असल्याचा अंदाज बांधला असावा, असा पोलिसांना संशय आहे.

याच माहितीच्या आधारे चोरट्यांनी घराची पाहणी करून चोरीची योजना आखली असण्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात चारा उत्पादन वाढविण्यासाठी नियोजन करा

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश; हायड्रोपोनिक्स चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक मॉडेल उभारणार; धरण क्षेत्रातील गाळपेर जमिनीचा चारा

नगर – जिल्ह्यातील संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध होण्यासाठी आतापासूनच व्यापक नियोजन करावे. जिल्ह्यात जास्तीत जास्त चारा उत्पादन घेण्यावर भर देतानाच उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती आणि विविध शासकीय योजनांचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील चारा नियोजनाबाबत आढावा बैठक पार पडली.

डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील चारा नियोजनाबाबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी (व्हिसीद्वारे), निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी चारा उत्पादन वाढविण्यासाठी विविध पर्यायांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील धरण क्षेत्रात पाणी कमी झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या गाळपेर जमिनीचा चारा लागवडीसाठी उपयोग करता येईल का, याचा संबंधित विभागांनी अभ्यास करावा. तसेच कृषी विभागामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या मिनी किटच्या माध्यमातून आणि बीजगुण केंद्रांच्या सहाय्याने चारा लागवडीचे नियोजन करता येईल का, याची तपासणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

व्ही.बी.जी. रामजी योजनेतून चारा लागवडीचे प्रकल्प व्ही.बी. जी. रामजी योजनेअंतर्गत सामूहिक तसेच वैयक्तिक स्वरूपात चारा लागवडीचे प्रकल्प राबविता येतील का, याचा विचार करून प्रत्येक तालुक्यात असे प्रकल्प हाती घेण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. यामुळे स्थानिक पातळीवर चारा उत्पादन वाढविण्यास मदत होईल. तसेच चारा उत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांचा समन्वयाने उपयोग करण्याचेही त्यांनी सूचित केले.

हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक कमी जागेत आणि नियंत्रित पद्धतीने चारा उत्पादन घेण्यासाठी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या जनावरांच्या बाजारात हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक मॉडेल उभारण्याबाबत नियोजन करावे. या माध्यमातून शेतकरी आणि पशुपालकांना या तंत्रज्ञानाची माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

गुरुवाणी – १०१

स्वावलंबन

'कषाय' म्हणजे वेगवेगळ्या निगेटिव्ह प्रतिक्रिया असतात. त्या रोखल्या तर सुख, दुःखातही शांत राहता येते. कुरूक्षेत्रात रणभूमीवर श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथ्य करत असतानाही त्यांचा चेहरा द्वारकेत असतो तसाच असतो. त्यांच्या इमोशनमध्ये कषाय नाही. ते प्रत्येक स्थितीत समान असतात. सामायिकमध्ये आपण आपल्याला पापकारी स्पंदनापासून रोखतो. सगळ्या प्रकारच्या स्पंदनांना थांबवले तर पूर्व कर्माची निर्जरा होते. सरावाने हे करणे शक्य आहे. मनात शरीराविषयी भविष्यातील कोणतीच प्लानिंग करायचे नाही. ही खूप सखोल साधना आहे. याला शरीर प्रत्याख्यान म्हणतात. म्हणजेच भविष्यातील दोषांचा परित्याग. परिवार, समाज सहयोगावर चालतो. पण समाजात राहुनही 'स्वावलंबी' होण्याचा संकल्प करणे शक्य आहे का? आपण जे काम स्वतः करू शकतो त्यासाठीही दुसऱ्यावर अवलंबून राहतो. परमात्मा सांगतात, 'जेवढे तुम्ही स्वावलंबी बनाल तेवढे तुमच्यातील कषाय, कलह कमी होतील'. सल्लेखना केली तरच मोक्ष मार्ग खुले होतात. संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या २२ व्या वर्षी संजीवन समाधीचा निर्णय घेतला. ही आहे अद्भुत साधना. चरम सल्लेखना सुद्धा साधना आहे. प्रतिरूप म्हणजे वेशभूषा नाही तर भाव भावनांची कॉपी. राजा श्रेणिक तीर्थंकर परमात्म्याशी तदरूप झाले. या साधनेचे प्रशिक्षण होऊ शकते. एकलव्याने द्रोणाचार्यांची प्रतिरूप साधनाच केली होती. आपण आपल्या दायित्वाशी एकरूप झालो तरच विश्वसनीयता येते. सेवा करणे, सामाजिक कार्य करणे दुर्मिळ नाही. पण समोरच्याला मजबूर नाही तर मजबूत समजून जो सेवा करतो, त्याला तीर्थंकर नाम कर्म बंध होतो. प्रत्येक व्यक्तीत परमात्मा आहे, हे लक्षात घेऊन सेवा केली पाहिजे. कोणतेही काम इतके परिपूर्ण करायचे की त्यात कोणतीच कसर राहिली नाही पाहिजे. परत त्याला तेच काम करायची गरज उरणार नाही. कशा विषयी आसक्ती नाही, लाईक डिसलाईक नाही. असे जीवन जगायला लागलो तर ती भावात्मक साधना असते. विपरीत परिस्थितीतही शांत राहता आले पाहिजे. 'सरलता' असेल तर मनातील, शरीरातील टॉक्सिन बाहेर पडतात. आपल्या भावनांत सत्यता आली तर तीर्थंकर परमात्म्याच्या धर्माची आराधना शक्य होईल. जे काम हाती घेतले ते पूर्ण करायचेच अशी विचारधारा असेल तर कार्यशक्ती जागृत होते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, आचार्य भगवंत, बाबा आमटे अशा अनेकांनी जो निश्चय केला तो कार्यशक्तीने पूर्ण केलाच.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



अहिल्यानगरचे युवा क्रिकेटपटू माही सिनारे यांनी अमेरिकेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

नगरच्या माही सिनारे यांचा अमेरिकेत क्रिकेटमध्ये डंका

युनिव्हर्सिटी ऑफ टोलेडोच्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचा बहुमान; दोन वेळा सामनावीर, एमव्हीपी क्रमवारीत द्वितीय स्थान

नगर – अहिल्यानगरचे युवा क्रिकेटपटू माही सिनारे यांनी अमेरिकेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ टोलेडो येथे आयोजित क्रिकेट स्पर्धेत प्रभावी गोलंदाजी आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्यांनी विविध वैयक्तिक पुरस्कारांवर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत माही सिनारे यांनी आपल्या गोलंदाजीतील अचूकता, चपळता आणि सामन्याची परिस्थिती ओळखून खेळण्याच्या कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांसमोर आव्हान निर्माण केले. त्यांच्या प्रभावी कामगिरीची दखल घेत त्यांना दोन सामन्यांमध्ये 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट गोलंदाजी केल्याबद्दल त्यांना 'स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज' हा बहुमान मिळाला.

विशेष म्हणजे स्पर्धेतील सर्वाधिक मौल्यवान खेळाडू अर्थात 'एमव्हीपी' क्रमवारीत त्यांनी द्वितीय स्थान पटकावले.

'बेस्ट प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने नगर येथील सुमया शेख सन्मानित

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनतर्फे गौरव; शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी निवड

नगर – श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माजी विद्यार्थिनी सुमया शेख यांना महाराष्ट्र राज्य वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनतर्फे उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन २०२६–२७ च्या 'बेस्ट प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांची शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.



सुमया शेख यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि सातत्यपूर्ण सराव महत्त्वाचा ठरला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव झाला असून, नवोदित खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली आहे.

सुमया हिला संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापिका अरुंधती भोकरे, माधवी जकल तसेच प्रशिक्षक प्रसाद पांडुळे, संजय गायकवाड आणि मंदा ताथेड यांचे मार्गदर्शन लाभले.

दि अन्नपूर्णा फूडसच्या तयार दिवाळी फराळाला मोठी मागणी

सणाचा आनंद द्विगुणित करणारी मिठाई व नमकीन

नगर – दि अन्नपूर्णा फूडस अॅण्ड इव्हेंटसच्या तयार दिवाळी फराळाला मोठी मागणी आहे. विनायकनगर रोडवरील ज्येष्ठ नागरिक भवनसमोर साईनगर येथे तसेच नगर शहरात घुमरे गल्ली अमृत किराणा शेजारी अन्नपूर्णाच्या रूचकर, स्वादीष्ट आणि घरगुती आपुलकीच्या चवीच्या फराळाची विक्री सुरु आहे. प्रेमाच्या स्वादामुळे फराळ विक्रीला प्रतिसाद मिळत असल्याचे महेंद्र (बाळू) गुगळे व गौतम गुगळे यांनी सांगितले.





तब्बल १० वर्षांपासून केटरिंग व्यवसायात अन्नपूर्णाने ठसा उमटविला आहे. उत्कृष्ट गुणवत्ता, हायजिन आणि घरगुती चव यामुळे अन्नपूर्णाचा दिवाळी फराळ सर्वांच्या पसंतीस उतरत आहे. शुध्द तूपातील मोहनथाल, मोतीचूर लाडू, बेसन लाडू, बालूशाही, गुलाबजामून याठिकाणी आहे. बटरस्कॉच कतली, काजू कतली, केशर कतली, बदामकतली, शुगर फ्री, काजू अंजीर रोल, ड्रायफ्रूट रोज क्रंच, तिरंगा सॅण्डविच, फॅन्सी मिठाई, करंजी, शंकरपाळे या मिठाईंना मोठी मागणी आहे. नमकीनमध्ये भाजका पोहा चिवडा, मका पोहा चिवडा, चनादाळ, मूंगदाळ, दाळ मोठ, मसाला शेव, टमाटर शेव, लसून शेव, रतलाम शेव, बाखरवडी, चकली, टेस्टी नटस् ग्राहक खरेदी करीत आहे. संपूर्ण मिठाई, नमकीन चांगल्या गुणवत्तेचे मटेरियल वापरुन तयार करण्यात येते. त्यामुळे शुध्दतेची आणि चवीची हमी मिळते. ग्राहकांनी दिवाळीचा गोडवा वाढविण्यासाठी अन्नपूर्णाच्या फराळाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन गुगळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ८७८८९९३५४५/९८९०९०४८१८.

जाहीर नोटीस

अहिल्यानगर–१ अहिल्यानगर जिल्ह्यातील सन २०२६–२७ या कालावधीकरीता ताडी दुकानांचे जाहीर फेर ई लिलाव–नि–निविदा प्रक्रिया राबवून ताडी दुकाना करीता अनुज्ञप्त्या मंजूर करणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर–१ अहिल्यानगर जिल्ह्यातील ताडी दुकाने ताडी वर्ष २०२६–२७ करिता जाहीर फेर ई लिलाव–नि–निविदा पध्दतीने देण्यात येणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील ताडी दुकानांचा फेर जाहीर ई लिलाव–नि–निविदा दि.२९/१०/२०२६ ते दि.२०/११/२०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेत–स्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहे. तसेच ताडी दुकानाचा फेर जाहीर ई–लिलाव दि. २०/११/२०२६ रोजी होणार असून याची सर्व इच्छूक निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

ताडी दुकानाची यादी, इतर नियम फेर ई लिलाव–नि–निविदा बाबतच्या अटी व शर्ती इत्यादी बाबतची सविस्तर माहिती http://www.mahatendrs.gov.in व http://www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहिती आवश्यक असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर–१ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

ठिकाण :– अहिल्यानगर, दिनांक ०३/११/२०२६
जिमाका /नगर /जाहि /१७४/२०२६

(नितीन गो घुले)
अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर–१

जाहीर प्रगटन (PUBLIC NOTICE)

सर्वसामान्य जनता, इच्छुक खरेदीदार. बांधकाम व्यावसायिक, विकासक, बँका, वित्तीय संस्था व संबंधित सर्व व्यक्तींना या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की. माझे अशील **(१) शेख शकीर शेख अब्दुल सत्तार. (२) आरिफ खान करीम खान जहागीरदार.** रा. अहिल्यानगर यांनी मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर येथे **वक्फ दावा क्र. १५२/२०२६** दाखल केला असून. हाजी हमीद तकिया, सावेडी. ता. व जि. अहिल्यानगर या वक्फ संस्थेच्या मिळकतीबाबत घोषणा, ताबा, कायमस्वरूपी व अनिवार्य मनाई हुकूम मिळण्याची मागणी केली असता मा. वक्फ न्यायाधिकरणाने प्रतिवादीविरुद्ध नोटिसा काढुन, त्यांचा जबाब मागितला आहे. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २५/११/२०२६ रोजी आहे.

सदर दाव्यातील प्रतिवादी क्रमांक १ ते १३ यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १. श्री. हर्षल संतोषकुमार भंडारी. २. श्री. विलास पोपटलाल कटारिया. ३. मे. लुनिया मुनोत अँड कंपनी तर्फे भागीदार (अ) श्री. रसिक झुंबरलाल लुनिया व (ब) श्री. राजेंद्र शांतिलाल मुनोत. ४. श्री. अशोक सिमरतलाल बोरा. ५. श्री. अजित सिमरतलाल बोरा. ६. सौ. अरुणा दिलीप मुथा, तर्फे जनरल पॉवर ऑफ अट्र्नी धारक श्री. विक्की दिलीप मुथा. ७. श्री. विक्की दिलीप मुथा. ८. सौ. पुष्पा गोकुळ गांधी, ९. हिंद सेवा मंडळ अहिल्यानगर. तर्फे श्री. सुमितलाल बन्सीलाल कोठारी. १०. श्री. वर्धमान शांतिलाल मुथा, ११ श्री. लाभेशकुमार शांतिलाल मुथा, १२. श्री. संग्राम अरुण जगताप ,आमदार. आणि १३. सय्यद हाजी हमीद तकिया ट्रस्ट/वक्फ संस्था, सावेडी, तर्फे विशवस्त/व्यवस्थापन समिती, श्री. सय्यद साबीर अली मन्सूर अली. दावेदारांच्या म्हणण्यानसार. वरील मिळकत ही हाजी हमीद तकिया, सावेडी या वक्फ संस्थेची वक्फ मिळकत असून, सदर मिळकतीबाबत प्रतिवादींनी केलेले खरेदीखत, भाडेपट्टा, लीज रद्द करण्याचा दस्त, गहाणखत व इतर व्यवहार बेकायदेशीर व वक्फ कायद्याच्या तरतदींविरुद्ध आहेत. सदर व्यवहारांची वैधता मा. वक्फ न्यायाधिकरणासमोर विचाराधीन आहे. तसेच सदर मिळकतीवर हर्षल भंडारी. महावीर ग्रुप व इतरांकडून करण्यात येणाऱ्या बांधकामास व संबंधित व्यवहारांना दावेदारांनी आव्हान दिलेले आहे.

त्यामुळे वरील मिळकतीबाबत **प्रतिवादी क्रमांक १ ते १३ किंवा त्यांच्या मार्फत कोणत्याही व्यक्तीशी खरेदी–विक्री, साठेखत, विक्रीचा करारनामा, बक्षीसपत्र, गहाणखत, अदलाबदलपत्र, भाडेपट्टा, विकास करारनामा पॉवर ऑफ अटर्नी, ताबा पावती अथवा अन्य कोणताही व्यवहार करू नये किंवा तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करू नयेत.** तसेच सदर मिळकतीच्या आधारे कोणतेही कर्ज अथवा वित्तपुरवठा करू नये. अशा प्रकारचा व्यवहार करणारी व्यक्ती स्वतःच्या जोखमीवर व जबाबदारीवर तो व्यवहार करीत असल्याचे समजण्यात येईल. अशा व्यवहारातून निर्माण होणाऱ्या हक्कांना व हितसंबंधांना माझे अशिल कायदेशीररित्या आव्हन देतील व आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करतील. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दाव्यातील मिळकतीचे वर्णन :

मौजे सावेडी. ता. व जि. अहिल्यानगर येथील टी.पी. स्कीम नं. ४ मधील फायनल प्लॉट नं. ४३–अ. एकूण क्षेत्र २७.६५६ चौ.मी. पैकी १४,१८६.४० चौ.मी. (अंदाजे ३ एकर २९ गुंठे). जुना सर्व्हे नं. १६१/१.
चतु:सीमा : पूर्वेस – नगर ते मनमाड रोड, दक्षिणेस –हिंद सेवा मंडळाचा फायनल प्लॉट नं. ३२
पश्चिमेस – फायनल प्लॉट नं. ३३, उत्तरेस – फायनल प्लॉट नं. ४३ (जुना सर्व्हे नं. १६१/२).
दिनांक : ०४/११/२०२६ स्थळ : अहिल्यानगर.

अॅड.ताहेर अली कादरी (अॅडव्होकेट हायकोर्ट)
ऑफीस– कादरी मंजिल, क्यू इलेक्ट्रीकल्स शेजारी लोटाकारंजा मोमीनपुरा रोड, औरंगाबाद,
मो–९६७३१७४७९५, ९५१८९४५३७९, Email -adv.t.a.quadri@gmail.com

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **श्री.अर्जुन माधव वराडे, रा.ऑक्सी व्हॅली फेज–२, ए विंग, फ्लॅट नं.११०४, बकोरी रोड,वाघोली, पुणे** यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क व अधिकार व हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, कॅन्टोन्मेंट हद्दीतील मौजे भिंगार येथील मोमीनगल्ली भागातील खालील वर्णनाच्या मिळकती –

१) स.नं.	घ.नं.	चौ.मीटर	चौ.फुट
२११–७५	१२९	१८४.३८	१९८४.००

यापैकी विद्यमान मालक यांचे वडिलोपार्जित मालकीच्या मिळकतीमधुन वारसा हक्कांने येणारी संपूर्ण समाईकातील अविभक्त हिश्याची संपूर्ण मिळकत याचे क्षेत्र ५३.८८ चौमीटरचे ५८०.०० चौ.मीटर यात विट सिमेंट मध्ये बांधकाम झालेली मिळकत याचे बांधकाम क्षेत्र ५३.८८ चौमीटरचे ५८०.०० चौ.मीटर असुन यातील इले.लाईट मिटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह मिळकत.

यांसी चतु:सिमा– कॅन्टोन्मेंट रेकॉर्डप्रमाणे.

२) स.नं.	घ.नं.	चौ.मीटर	चौ.फुट
२११–७२	१२८	२३.२३	२५०.००

ही संपुर्ण जागा व यात विट सिमेंट मध्ये एक पत्र्याची खोली याचे बांधकाम क्षेत्र २३.२३ चौ.मीटर असुन यातील इले.लाईट मिटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह मिळकत.

यांसी चतु:सिमा– कॅन्टोन्मेंट रेकॉर्डप्रमाणे.
दि.०४/११/२०२६, अहमदनगर.

अॅड. मोहसीन इलियास शेख
ऑफीस– शॉप नं. १ व २, कस्तुरी प्लाझा, कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर, मो. ८०८७७४२४२८

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली प्लॉट मिळकत **विद्यमान मालक बाळासाहेब फकिरराव फुलसौंदर रा. फुलसौंदर मळा ,नक्षत्र लॉन जवळ,अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर करुन कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क व अधिकार व हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन– जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार येथील स. नं. ३६९/३ब/हिस्सा १७** मधील बिगरशेती प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे

प्लॉट नं.	क्षेत्रफळ चौ. मी.	चतु:सिमा			
		पुर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
१३	१५६.५२	प्लॉट नं. १४	रोड	प्लॉट नं. १२	लागु मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत असे.
दि. ०४/११/२०२६. अहिल्यानगर

अॅड. उषा राजाराम जगदाळे (पटेल)
पत्ता– समर्थ स्कुल जवळ, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर
मो–८८८८८८१९९

गाडीची काच फोडून एक लाखाची चोरी

नगर – एमआयडीसीमध्ये गाडी पार्कींग गेली असता अज्ञात चोरट्याने गाडीची काच फोडून एक लाखाची रूपयांची चोरी केल्याची घटना ३ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन ते अडीचच्या सुमारास घडली.

याबाबत योगेश संपतराव कातोरे यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

कातोरे हे एमआयडीसीत खासगी कंपनीत नोकरीस असून त्यांनी त्यांच्या मालकीची हेरीयर कंपनीची एमएच १६ सीव्ही ७३८३ या क्रमाकाची गाडी एस के एन्टरप्रायझेस ब्लॉक नं. एफ २६ येथे पार्कींग केली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने गाडीच्या पुढच्या डाव्या दरवाजाची काच फोडून ५०० रूपयांचे बंडल असलेल्या एक लाख रूपयांची चोरी केली.

डॉ.श्रुती सोनवणे यांना पीएचडी पदवी प्रदान

नगर – ना.बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट काष्टी संचलित परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी कॉलेज असिस्टंट प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या प्रा.श्रुती चंद्रकांत सोनवणे यांनी सनराईस युनिव्हर्सिटी अल्वार राजस्थान येवून पीएचडी इन फार्मास्युटिकल सायन्स ही सर्वोच्च पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. प्रा.सोनवणे यांनी फार्मसी विभागातून मार्गदर्शक डॉ.बालाजी वाकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाचा विषय Study of Native Medicinal Herbs for Dermatological Screening and Formulation हा होता. त्वचारोगावरील उपयोग आणि त्यापासून औषध निर्मिती. शिक्षण क्षेत्रात प्राध्यापिका म्हणून कार्यरत असताना त्यांनी मिळविलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलनाचे अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव अॅड. आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. प्रतापसिंह पाचपुते यांनी अभिनंदन केले.



त्यांच्या या जिद्द, चिकाटी आणि उल्लेखनीय शैक्षणिक काम गिरीने त्यांनी आपल्या कुटुंबासह संपूर्ण संस्थेचे आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ यांनी दिली.

मारहाण आणि शस्त्र बाळगल्याच्या गुन्ह्यातील पाच आरोपींची न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

नगर – मारहाण करणे, दुखापत करणे तसेच लाकडी दांडके व तलवारीसारख्या शस्त्रांचा वापर केल्याच्या आरोपातून पाच आरोपींची अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

या प्रकरणातील निर्दोष मुक्तता झालेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे – स्वप्नील सुनील पारधे, सनी उर्फ कुणाल अनिल कांबळे, गौरव राजेंद्र गायकवाड, अमोल हिरामण गायकवाड, अभिषेक उर्फ घाऱ्या दिलीप लोणारे.

या प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १४८०/२०२१ अन्वये भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३२४ सह १४९ तसेच आर्म्स अॅक्ट कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, ३० जून २०२१ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी एकत्र येऊन फिर्यादीस लाकडी दांडके व शस्त्रांनी मारहाण करून जखमी केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर खटल्याची सुनावणी अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक १८ येथे झाली. न्यायालयाने अभियोग पक्षाने सादर केलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब व संपूर्ण खटल्यातील परिस्थितीचे अवलोकन करून ३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर केला.

अभियोग पक्ष आरोपींवरील आरोप संशयापलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याने न्यायालयाने पाचही आरोपींची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात आरोपींच्या वतीने अॅड. स्नेहा लोखंडे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली, तर अॅड. ज्योत्स्ना ससाणे यांनी त्यांना सहकार्य केले.



यंदाची सुवर्णखरेदी दिवाळी धमाका ऑफर भरघोस फायद्याची..



₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

चंदुकाका ज्वेल्स

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..

Conditions Apply*

सावेडी भागात आईस्क्रीम पार्लरसाठी स्टाफ पाहिजे 9881888260

पाहिजेत पाईपलाईन रोड येथे वडापाव दुकानात हेल्पर कारागीर पाहिजेत 9225955781

त्वरित पाहिजेत सावेडी भागामध्ये सिक्युरिटी गार्ड व हाऊस किंपीग मावशी पाहिजे 9579555582 9730415003

विकणे आहे 2BHK रो-हाऊस घर विकणे आहे केडगाव एकनाथनगर भागातील सरस्वती टॉवर्स मागील 9890312412

शॉप विकणे पाईपलाईन रोडटच मोरया मंगल कार्यालयासमोर ४०० स्क्वे. फुट शॉप कापडदुकानाच्या फर्निचरसहित विकणे आहे. 9028132001 9511809700

चहा स्टॉल साठी लागणारे सर्व वस्तू विकणे आहे तीन शेगडी काऊंटर,एक साईड काऊंटर,चार बैठक, दोन राऊंड टेबल, दोन लहान काऊंटर गल्ल्यासह, नावाचे लाईट एक्रेलिक बोर्ड व इतर साहित्य.(किंमत २ लाख रुपये) 9272449475 8293742555

लक्झरीयस 3BHK बंगला भाड्याने देणे भिस्तबाग परिसरात प्राईम लोकेशन मध्ये फर्निचरसह व ३ टॉयलेट अटॅच बाथरुम + २४ तास गरम पाणी, पार्किंग व लिफ्टची सोय असलेला दुमजली बंगला डिपॉझिट २ लाख रु. / म.म. भाडे ३५ हजार रु. 8293742555

दिवाळी महासेल.. स्टॉक असेपर्यंत...

महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३

लेडीज : स्मॉल ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3XL ते 6xL रु.३००/-

* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर 100 x 100 चे ८०० चे रु.४००/- 108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-

वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत

प्रत्येक रु.१००० च्या खरेदीवर एक लकी ड्रॉ कुपन..

* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

बंगला विकणे गुलमोहोर रोड, आम्रपाली गार्डनसमोर, १५७५ स्क्वे. फुट प्लॉट गुलमोहोर हौ. कॉलनी रोड पासून दुसरा प्लॉट समोर ओपन स्पेस 9834135775,9270927859

HAPPY Diwali
Light up the festivities with timeless style



THE Raymond SHOP
Custom Tailoring | Ready-to-Wear | Accessories

GALAXY

अहिल्यानगर
शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम्. जी. रोड, कापडबाजार. ☎ ०२४१-२९९१६६०
शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ☎ ०२४१-३३५३०९२

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026



रामायण ३ डी (हिंदी)
07:00 AM 06:15 PM
10:45 AM 10:00 PM
02:30 PM

रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 08:45 AM
11:45 AM 12:30 PM
03:30 PM 04:15 PM
07:15 PM 08:00 PM
11:00 PM 11:35 PM
10:00 AM 01:45 PM
05:30 PM 09:15 PM

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

लोकेश मार्केटिंग 9766045549

चोखंदळ विक्रेत्यांसाठी व ग्राहकांसाठी
आहेर घर
१८+१८+१८=५४ प्रकार
दिवाळी कार्तीक मास लग्नसराई, गिफ्ट पॅक अनुभव हिच खात्री
एक वेळ अवश्य भेट द्या

लक्ष्मण एजन्सीज 9890963100

शुभ दीपावली

जोखीम म्हणजे नक्की काय?
हे फक्त बाजाराच्या घसरणीत तपासू नका!

गुंतवणूक करण्याअगोदर योग्य पर्याय व जोखीम समजावून घ्या!

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे दिनांक : 23 ते 29 ऑक्टोबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

SCREEN - 1

दशमी 03:00 PM 150/-
गांव थी गावकी.. 12:00 Noon 150/-
प्रहार (हिंदी) 09:00 PM 150/-
सोहळा 06:00 PM 150/-

SCREEN - 2

रजनी : द जेलर २ (हिंदी) 12:00 Noon 150/- 09:00 150/-
दृश्यम ३ 03:00 150/-
कासुरकोंडा (मराठी) 06:00 PM 150/-

आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

खास दिवाळी आणि भाऊबीज निमित्ताने
घरगुती व्यवसाय करणाऱ्या लाडक्या बहिणींसाठी खास सवलत योजना तुम्ही आमच्या कडून आवडेल त्या साड्या होलसेल दरात घेऊन जा आणि न विकलेल्या साडया परत देऊन नवीन स्टॉक घेऊन जा.



सिवाराम पॅन्ट पीस शर्ट पीस जोडी 499/- रु मध्ये
रेमंड शुटिंग ₹ 299/- मीटर मध्ये
सर्व प्रकारचे फॅन्सी रेडिमेड वर 20 ते 50 % डिस्काऊंट
5 x 7 चा वेलवेट गालिचा 249/- रु मध्ये

सर्व वस्तूंची अशी रेंज जी रेग्युलर मार्केटला पहायला मिळणार नाही. आणि तेही होलसेल रेटमध्ये...

अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

Mutual Fund PMS SIF
म्युच्युअल फंड पीएमएस एसआयएफ

Creative 9822218425

Deshpande Investments
The Mutual Fund House

18, Sonanagar, Savedi, Ahilyanagar
deshpandeinvestment@gmail.com
www.deshpandeinvestments.com

Rajesh Deshpande
M.A. (Economics), MBA (Finance)
Exce. FRM-IIM (Vizag)
ARN 77369, NISM Certified
AMFI Reg. MFD/PMS
9850724890

"Mutual fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing."



फेब इंडियन हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन

आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही बुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे

- चंदेरी आणि पटोरा साडी
- बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
- पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी
- लखनवी चिकन • कोटा सिल्क
- काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
- जयपूर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
- भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट

BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत

पार्किंग व एन्ट्री फ्री

ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

तृतीय पुण्यस्मरण



स्व. बन्सीलाल दौलतराम आसनानी
स्वर्गवास : ता. ०४/११/२०२३

सब कुछ होने के बावजूद भी
कुछ भी नहीं है, ऐसा लगता है
आपके बिना, यह परिवार खाली है

आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली
- शोकाकूल -
समस्त आसनानी परिवार तथा रिश्तेदार
मो. 9890050050 (डॉ. संजय आसनानी)
मो. 9823565657 (मनिष आसनानी)